रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १७ ◆ अंक २६९
www.ramprahar.com

गुरुवार, १७ एप्रिल २०२५ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

## देशातील पहिले डिजिटल शिक्षण पोर्टल महाराष्ट्रात सुरू

**मुंबई :** महाज्ञानदीप या ऑनलाईन पोर्टलच्या माध्यमातून शैक्षणिक सुविधांचे लोकाभिमुखीकरण करण्यासाठी देशातील पहिले डिजिटल शिक्षण पोर्टल महाराष्ट्रात सुरू झाले असल्याचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी सांगितले. मुंबईत 'महाज्ञानदीप' पोर्टलचा शुभारंभ मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. ते म्हणाले, 'महाज्ञानदीप' उपक्रमांतर्गत एक हजार तज्ज्ञ प्राध्यापक घडवण्याचा संकल्प आहे. आतापर्यंत १५० प्राध्यापकांना प्रशिक्षण देण्यात आले असून, त्यांनी नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० अंतर्गत 'भारतीय ज्ञान प्रणाली – जेनेरिक' हा अभ्यासक्रम मराठी भाषेत तयार केला आहे. हा अभ्यासक्रम या पोर्टलवर अपलोड करण्यात आला असून जगभरातील विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध आहे. या पोर्टलच्या माध्यमातून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनाही गुणवत्तापूर्ण शिक्षण ऑनलाईन सहज एका क्लिकवर उपलब्ध होणार आहे.

अंतरंग

कलावंतांच्या तक्रारी निवारणासाठी समिती/२

रायगड जिल्ह्यात ४० टक्के पाणीसाठा उपलब्ध/५

प्रीमियर लीगसाठी खेळाडूंचा खोपोलीत होणार ऑक्शन/८

## शेकाप नेते पंडित पाटील, आस्वाद पाटील यांचा शेकडो समर्थकांसह भाजपमध्ये प्रवेश

# रायगड जिल्हा भाजपमय होणार

### महाराष्ट्र प्रदेश कार्याध्यक्ष रवींद्र चव्हाण यांचा विश्वास

**मुंबई : प्रतिनिधी**

आगामी काळात रायगड जिल्ह्यात भाजप शतप्रतिशत होणार असा विश्वास भाजपचे कार्यकारी अध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी बुधवारी (दि.१६) व्यक्त केला. शेतकरी कामगार पक्षाचे सरचिटणीस जयंत पाटील यांचे बंधू माजी आमदार पंडितशेठ तथा सुभाष पाटील यांनी बुधवारी जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष ॲड. आस्वाद पाटील, माजी सभापती चित्रा पाटील, सवाई पाटील यांच्या समवेत भारतीय जनता पक्षामध्ये प्रवेश केला.



प्रदेश कार्यालयात झालेल्या या पक्षप्रवेश कार्यक्रमावेळी रवींद्र चव्हाण बोलत होते. या वेळी खासदार धैर्यशील पाटील, आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, प्रदेश सरचिटणीस आमदार विक्रांत पाटील, अविनाश कोळी, कमलाकर दळवी, माध्यम विभाग प्रमुख नवनाथ बन, सतीश धारप, ॲड. नीलिमा पाटील, वैकुंठ पाटील, ॲड. महेश मोहिते, युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष निलेश थोरे, जिल्हा सरचिटणीस प्रशांत शिंदे आदी उपस्थित होते. या वेळी चव्हाण म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात देश आणि राज्य विकासाच्या वाटेवर वेगाने जात आहे. या दोघांवर असलेल्या विश्वासामुळे पाटील यांनी शेकापच्या शेकडो कार्यकर्त्यांसमवेत भाजपमध्ये प्रवेश केला आहे. पंडित पाटील हे सर्वसामान्य जनतेला न्याय मिळवून देण्यासाठी संघर्ष करणारे व्यक्तिमत्व आहे. त्यांच्या प्रवेशामुळे रायगड जिल्ह्यात पक्षसंघटनेला अधिक ताकद मिळणार आहे. पंडित पाटील यांचा पक्षात यथोचित सन्मान राखला जाईल, अशी ग्वाहीही त्यांनी दिली.

माजी आमदार दिवंगत मीनाक्षी पाटील यांचे पुत्र तसेच रायगड जिल्हा बँकेचे संचालक आस्वाद पाटील यांच्यासह जिल्हा परिषदेचे सहा माजी सभापती, सात जिल्हा परिषद सदस्य आणि जिल्हा बँकेचे दोन संचालक, आजी माजी ६० सरपंच यांसह अनेकांनी भाजपमध्ये प्रवेश केला. शेकापमधून भाजपमध्ये प्रवेश केलेल्यांमध्ये जनार्दन पाटील, सुगंधा पाटील, संजय पाटील, प्रियदर्शनी पाटील, भावना पाटील, संदीप घरत, एकनाथ गायकवाड, वैभव चांदे, वसंत यादव, राजा सानप, स्मिता पाटील, महादेव दिवेकर, सुमन पाटील, प्रीती पाटील, यतीन घरत आदींचा समावेश आहे.

### आगामी काळात जोमाने काम करू –पंडित पाटील

मी शेतकरी कामगार पक्षात जीवाचे रान केले, पण तिथे माझ्यावर अविश्वास दाखविला, तर भाजपने माझ्यावर विश्वास दाखविला. भाजप शिस्तबद्ध पार्टी आहे, सर्वांना विश्वासात घेऊन काम करते. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली देश आणि राज्याचा सर्वांगीण विकास होणार असल्याने आम्ही भाजपमध्ये प्रवेश केल्याचे पंडित पाटील यांनी सांगितले. रायगड जिल्ह्याच्या विकासासाठी भाजपच्या साथीने आगामी काळात जोमाने कार्य करून जिल्ह्यात भाजपला क्रमांक एकचा पक्ष बनवू असा शब्द ही पंडित पाटील यांनी दिला.

### शेकापला घरातूनच सुरुंग

शेतकरी कामगार पक्षाला मोठा धक्का तर शेकापला घरातूनच संघटनात्मक सुरुंग लागला असल्याचे बोलले जात आहे. रायगड जिल्ह्यात एकेकाळी संघटनात्मक दरारा असलेल्या शेतकरी कामगार पक्षाला येत्या काळात गळती लागल्याचे चित्र दिसून येतेय.

**नवी मुंबई : परिणीता सोशल फाऊंडेशनच्या परिणीता सन्मान पुरस्कार वितरण सोहळ्यात राज्याचे उद्योग तथा राजभाषामंत्री उदय सामंत यांना उद्योग गुरू पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते मंत्री सामंत यांना गौरवण्यात आले.** (वृत्त पान २ वर..)



## सरकारद्वारे शेतकऱ्यांच्या जीवनात परिवर्तन होणार

■ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे प्रतिपादन; सानुग्रह अनुदान वाटप

**अमरावती : प्रतिनिधी**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अमरावती येथे विदर्भातील प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना ८३२ कोटी सानुग्रह अनुदानाचे वाटप केले. या वेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी परिसरातील शेतकरी बांधवांच्या जीवनात राज्य सरकारद्वारे सुरू असलेल्या विविध योजनांच्या माध्यमातून परिवर्तन घडेल, असा विश्वास व्यक्त केला.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, या योजनेच्या माध्यमातून शेतकऱ्यांना न्याय देण्याची संधी मिळाली आहे. २००६ ते २०१३ या कालावधीत तत्कालीन सरकारने विदर्भात ज्याप्रकारे शेतकरी बांधवांची फसवणूक केली, ती अतिशय वेदनादायी होती. शेतकऱ्यांचे सर्व हक्क गोठवून त्यांना लाभापासून वंचित ठेवण्यात आले. तुटपुंजी रक्कम देऊन त्यांच्या जमिनी घेण्यात आल्या. २०१४ मध्ये मुख्यमंत्री झाल्यावर जीआर काढला व थेट खरेदी करायची असेल तर पाचपट किंमत द्यावी लागेल, असा निर्णय घेतला. **(पान २ वर..)**

## निवडक

### रॉबर्ट वधेरा यांची ईडीकडून चौकशी

**नवी दिल्ली :** हरियाणातील शिकोपूर कथित जमीन गैरव्यवहार प्रकरणात रॉबर्ट वधेरा यांची पुन्हा चौकशी केली. ते सलग दुसऱ्या दिवशी ईडी कार्यालयात पोहचले आहेत. रॉबर्ट वधेरा त्यांच्या पत्नी आणि काँग्रेस खासदार प्रियंका गांधी यांच्यासोबत ईडी कार्यालयात पोहचले होते. हरियाणातील शिकोहपूर येथील एका जमीन व्यवहाराशी संबंधित हे प्रकरण आहे.

### पंचवटी एक्सप्रेसमध्ये सुरू झाली एटीएम सुविधा

**मुंबई :** भारतातील रेल्वे प्रवास आता अधिक आधुनिक आणि सोयीस्कर होत चालला आहे. त्यातीलच एक पुढचे पाऊल म्हणजे मुंबई–मनमाड पंचवटी एक्सप्रेस ही भारतातील पहिली एटीएम ट्रेन बनली आहे. या ट्रेनमध्ये प्रवाशांसाठी ऑनबोर्ड एटीएमची सुविधा देण्यात आली आहे. प्रवासी ट्रेनमध्ये प्रवास करतानाही रोख रक्कम काढू शकतील तसेच चेकबुक मागवणे आणि बँक खात्याचे विवरण अशा एटीएम मशिनद्वारे मिळणाऱ्या बँकिंग सेवादेखील मिळणार आहेत.

## सुटकेसमध्ये आढळले महिलेच्या शरीराचे तुकडे; कर्जतमध्ये खळबळ

**नेरळ : प्रतिनिधी**

सुटकेसमध्ये मृतदेह ठेवून आरोपी फरार होत असल्याच्या घटना समोर येत असताना एक धक्कादायक प्रकार कर्जतमधून समोर आला. मुंबई–पुणे या मध्य रेल्वे मार्गाजवळ एका सुटकेसमध्ये महिलेचा मृतदेह सापडून आला आहे. तुकडे केलेल्या अवस्थेत हा मृतदेह असल्याचे समजते. गुलाबी रंगाच्या सुटकेसमध्ये हा मृतदेह असून हाताचा काही भाग बॅग बाहेर दिसून आल्याने घटना उघडकीस आलेली आहे. दरम्यान, या घटनेने कर्जत तालुका हादरून गेला आहे. मृतदेहाची ओळख पटली नसून कर्जत पोलीस घटनास्थळी दाखल झाले आहेत.



मुंबईहून पुणेकडे येणारी रेल्वे मार्गिकेवरील टीकेडब्ल्यू किमी क्रमांक ११२/५ ईके कर्जत पोलीस ठाणे हद्दीत येत असलेल्या स्टेशन ठाकुरवाडी परिसरात सकाळी सव्वा अकरा वाजण्याच्या सुमारास येथील नागरिकांना गुलाबी सुटकेस दिसून आली होती. या सुटकेसमधून एक मानवी हात बाहेर अर्धवट दिसत असल्याने ही घटना रेल्वे पोलीस आणि कर्जत पोलिसांना देण्यात आली होती. एका महिलेचा हा मृतदेह असून त्याचे तुकडे करून सुटकेस मध्ये आरोपीने भरल्याचे दिसून येत आहे. महिलेचा डोक्याचा भाग आणि हाताचा भाग दिसून आल्याने हा मृतदेह महिलेचा असल्याचे उघडकीस आले. सदर मृतदेह हा रेल्वे प्रवासादरम्यान आरोपीने रेल्वे लाईन परिसरात फेकून दिल्याचा अंदाज लावण्यात आला आहे. मुंबईकडून पुणे दिशेने ही सुटकेस सापडून आलेली असल्याने त्या अनुषंगाने पोलीस तपास करीत आहेत.

महिला कुठली आणि कोण आहे तसेच आरोपीने तिचा खून का आणि कशासाठी आणि कोणी केला म्हणून पोलिसांसमोर प्रश्न आहेत. राज्यात सध्या सुटकेस मध्ये मृतदेह ठेवून त्याची विल्हेवाट लावणे या घटना सातत्याने समोर येऊ लागल्याने भीतीचे वातावरण आहे.

### कुमार मंगलम बिर्ला यांना मंगेशकर पुरस्कार

**मुंबई :** यंदाचा 'लता दीनानाथ मंगेशकर' पुरस्कार' जाहिर करण्यात आला आहे. यंदाचा यंदाचा 'लता दीनानाथ मंगेशकर पुरस्कार' उद्योगपती कुमार मंगलम बिर्ला यांना घोषित करण्यात आला आहे. मंगेशकर कुटुंबीयांनी परिपत्रकाच्या माध्यमातून पुरस्कारांची घोषणा केली आहे. दरम्यान, कुमार मंगलम बिर्ला यांच्यासह श्रद्धा कपूर, सचिन पिळगावकर, सोनाली कुलकर्णी यांनादेखील पुरस्कार जाहीर करण्यात आसा आहे.

दीनानाथ मंगेशकर यांचा ८३ वा स्मृतिदिन मुंबईतील विलेपार्ले (पूर्व) येथील दीनानाथ मंगेशकर नाट्यगृहात २४ एप्रिल रोजी कृपा, कृतज्ञता आणि भव्यतेने साजरा केला जाणार आहे. भारतरत्न लता मंगेशकर यांच्या निधनानंतर 'लता दीनानाथ मंगेशकर'हा पुरस्कार त्यांच्या स्मरणार्थ दिला जातो. पुरस्काराचे पहिले मानकरी पंतप्रधान नरेंद्र मोदी हे ठरले होते.

## पंतप्रधान मोदींच्या हस्ते होणार आंबा महोत्सवाचे उद्घाटन

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

राजधानी दिल्लीतील नविन महाराष्ट्र सदनात आंबा महोत्सव आयोजित करण्यात आला असून या महोत्सवाचे उद्घाटन पंतप्रधान नरेंद्र मोदी करणार आहेत. ३० एप्रिल रोजी सायंकाळी ६ वाजता उद्घाटन सोहळा पार पडणार आहे. खासदार रवींद्र वायकर यांच्या संकल्पनेतून दिल्लीत या महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.

आंबा महोत्सवासंदर्भात खासदार वायकर यांनी दिल्लीत पत्रकार परिषद घेतली. या वेळी बोलताना ते म्हणाले की, कोकणातील देवगड आणि रत्नागिरीतील हापूस आंबा महाराष्ट्रासह देशभरात प्रसिद्ध आहे. कोकणातील शेतकऱ्यांना विविध राज्यांमध्ये थेट बाजारपेठ उपलब्ध व्हावी, त्यांना जास्तीत जास्त नफा मिळावा, आंब्याच्या निर्यातीला अधिक चालना मिळावी, या हेतूने दिल्लीत ३० एप्रिल ते १ मेपर्यंत आंबा महोत्सवाचे आयोजन केले आहे. या महोत्सवाचे उद्घाटन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते व्हावे, यासाठी त्यांची भेट घेतली होती. त्यानुसार पंतप्रधान आंबा महोत्सवाचे उद्घाटन करणार आहेत, अशा माहिती खासदार वायकर यांनी दिली.

खासदार वायकर म्हणाले की, आंबा महोत्सवामुळे ग्रामीण भागातील उद्योजकांना मोठ्या प्रमाणात बाजारपेठ उपलब्ध होणार आहे. या महोत्सवात विविध सांस्कृतिक कार्यक्रमाचेही आयोजन करण्यात येणार आहे. महोत्सवाला राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार, विविध केंद्रीय मंत्र्यांसह विविध राज्यातील खासदार, आमदारही उपस्थित राहणार आहेत.

## पनवेलची टेबल टेनिसपटू स्वस्तिका घोषला शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार जाहीर

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

महाराष्ट्रातील प्रतिष्ठेच्या समजल्या जाणाऱ्या शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कारांची घोषणा मंगळवारी करण्यात आली. हा मानाचा शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार (सन २०२३–२४) करिता पनवेलच्या स्वस्तिका घोष हिला टेबल टेनिस खेळात जाहीर झाला आहे. या पुरस्काराचे वितरण पुण्यात शुक्रवारी (दि.१८) सकाळी ११ वाजता बालेवाडी येथील शिवछत्रपती क्रीडा संकुलात राज्यपाल सी पी राधाकृष्ण यांच्या उपस्थितीत होणार आहे. स्वस्तिकाला मिळणारा पुरस्कार पनवेलकरांसाठी अभिमानाची बाब आहे.



या सोहळ्याला राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, अजित पवार, केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील, क्रीडामंत्री दत्तात्रय भरणे आदी मान्यवर उपस्थित राहणार आहे. स्वस्तिका घोषला प्रतिष्ठेचा शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार जाहीर झाल्याने तिचे सर्व स्तरांतून अभिनंदन व कौतुक होत आहे.

आंतरराष्ट्रीय खेळाडू स्वस्तिका घोष ही जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या सीकेटी कॉलेजची विद्यार्थिनी आहे. खारघर येथील रामशेठ ठाकूर पब्लिक स्कुलमध्ये स्वस्तिकाने इयत्ता तिसरी ते बारावीपर्यंत शिक्षण घेतले. त्यानंतर आता ती खांदा कॉलनी येथील सीकेटी महाविद्यालयात (स्वायत्त) बीएमएसचे शिक्षण घेत आहे. स्वस्तिकाने देशात व परदेशात झालेल्या टेबल टेनिस स्पर्धेत चमकदारी कामगिरी करीत देशाचे नाव उंचाविले आहे.

गेल्या दहा वर्षांपासून ती महाराष्ट्र राज्याचे प्रतिनिधीत्व करीत आहे. खारघरच्या रामशेठ ठाकूर कॉलेजमध्ये ती दररोज सहा तास खेळाचा सराव करीत असते. स्वास्तिकाचे वडील संदीप घोष हे या खेळातील प्रशिक्षक आणि सल्लागार आहेत. जाहीर झालेल्या शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्काराबाबत प्रसारमाध्यमांना प्रतिक्रिया देताना स्वस्तिकाचे वडील संदीप घोष यांनी सांगितले की, टेबल टेनिससाठी लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी स्वस्तिकाला वेळोवेळी आर्थिक मदत करण्याबरोबरच प्रशिक्षणासाठी खारघर येथील विद्यालयात विशेष सोय केली आहे. स्वस्तिकाच्या या यशाचे संपूर्ण श्रेय जनार्दन शिक्षण प्रसारक संस्था, लोकनेते रामशेठ ठाकूर यांना जाते.

## भारतातील सर्वात मोठा मेट्रो डेपो महाराष्ट्रात

### एकाचवेळी उभ्या राहणार तब्बल ७२ मेट्रो!

**मुंबई : प्रतिनिधी**

रेल्वे प्रमाणेच भारतातील अनेक राज्यांमध्ये मेट्रो ट्रेनचे जाळे तयार केले जात आहे. विशेषत: महाराष्ट्रात अनेक मोठे रल्वे प्रकल्प उभारले जात आहे. यात मुंबईत निर्माण होत असलेले मेट्रो रेल्वे प्रकल्प विशेष लक्षवेधी ठरत आहे. पूर्व उपनगर आणि हार्बर रेल्वे लाईन जोडणाऱ्या मार्गावर मेट्रो–२ बी ची यशस्वी ट्रायल झाली. भारतातील सर्वात मोठा मेट्रो डेपो महाराष्ट्रात अर्थात मुंबईत बनला आहे. इथे एकाचवेळेस ७२ मेट्रो उभ्या राहतील.



लवकरच मुंबईत मेट्रो–२ बी धावणार आहे. डीएन नगर ते मंडाले या पहिल्या टप्प्यातील मेट्रो २ बी प्रकल्पात पहिले ५ स्टेशन कार्यरत केले जात आहेत.

मंडाले, मानखुर्द, बीएसएनएल, शिवाजी चौक डायमंड गार्डन या स्थानकांदरम्यान ५.३९ किमी च्या टप्प्यावर मेट्रोची ट्रायल रन सुरू करण्यात आली आहे. मेट्रो २ बी चं वैशिष्ट्य म्हणजे भारतातला सर्वात मोठा मेट्रो डेपो मंडाले येथे तयार करण्यात आलाय. ३१ हेक्टर जागेवरच्या या डेपोत एकाच एकाचवेळी ७२ मेट्रो उभ्या केल्या जाऊ शकतात.

गेल्या अनेक वर्षांपासून रखडलेली ही मेट्रो मार्गिका सुरू होण्याच्या दिशेने महत्त्वपूर्ण पाऊल टाकले आहे. पूर्व आणि पश्चिम उपनगरांना जोडण्यासाठी एमएमआरडीएकडून अंधेरी पश्चिम ते मानखुर्द–मंडाळेदरम्यान तब्बल २३ किलोमीटरची मेट्रो मार्गिका उभारली जात आहे. पहिल्या टप्प्यात मंडाळे डेपो ते डायमंड गार्डन चेंबूरदरम्यानच्या मेट्रो मार्गिकचे काम पूर्ण झाले आहे.

दरम्यान, मुंबई मेट्रो लाईन–५च्या कामाचा ऐतिहासिक टप्पा पूर्ण झाला आहे. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने ठाणे–भिवंडी–कल्याण या मुंबई मेट्रो लाईन ५ च्या (पहिला टप्पा) अंतर्गत मध्य रेल्वेच्या वसई–दिवा मार्गावर अंजुरफाटा, भिवंडी येथे ६५ मीटर लांबीचा ओपन वेब गर्डर (OWG) यशस्वीरित्या बसवण्याची महत्त्वपूर्ण कामगिरी पार पाडली आहे. एमएमआरडीएने कठीण काम तीन टप्प्यात केले आहे.

# पंडित दीनदयाळ उपाध्याय मानव एकात्म हीरक महोत्सव

## ■ राज्यात २२ ते २५ एप्रिल २०२५ या कालावधीत विविध उपक्रम राबवणार

**मुंबई : प्रतिनिधी**

समाजातल्या शेवटच्या घटकांपर्यंत विकास पोहचला पाहिजे, खऱ्या अर्थाने अंत्योदयांच्या माध्यमानेच लोकशाहीच्या उदिष्टांची पूर्ती होईल, हा मौलिक विचार पंडित दीनदयाळ उपाध्याय यांनी मांडला. त्यांच्या विचारांवर आधारित पंडित दीनदयाळ उपाध्याय एकात्म मानवदर्शन हीरक महोत्सव राज्यभरात राबवण्यात येणार आहे. या महोत्सवात विविध उपक्रम राबवण्यात येणार आहे शासनाच्या सर्व विभागांनी तसेच जिल्हास्तरावर हा कार्यक्रम यशस्वीपणे राबवावा असे कौशल्य विकास,उद्योजकता आणि नावीन्यता मंत्री मंगल प्रभात लोढा यांनी निर्देश दिले.

राज्यात २२ ते २५ एप्रिल या कालावधीत पंडित दीनदयाळ उपाध्याय एकात्म मानवदर्शन हीरक महोत्सव राबवण्यात येणार आहे याबाबत मंत्रालयात मुख्य सचिव सुजाता सौनिक यांच्या दालनात बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत कौशल्य विकास मंत्री मंगल प्रभात लोढा बोलत होते. यावेळी मुख्य सचिव सुजाता सौनिक, कौशल्य विकास विभागाच्या अपर सचिव मनीषा वर्मा, दिव्यांग कल्याण विभागाचे अपर



मुख्य सचिव अनिल डिग्गीकर, पर्यटन विभागाचे प्रधान सचिव अतुल पाटणे, शालेय शिक्षण विभागाचे प्रधान सचिव रणजितसिंह देओल, महिला व बाल विकास विभागाचे सचिव अनुप कुमार यादव, आदिवासी विकास विभागाचे सचिव विजय वाघमारे, दीनदयाळ संशोधन संस्थेचे सचिव अतुल जैन उपस्थित होते.

दूरदृश्यप्रणालीद्वारे राज्यातील सर्व जिल्हाधिकारी या बैठकीत सहभागी झाले होते. या महोत्सावासाठी शासनाने पंडित दीनदयाळ उपाध्याय एकात्म मानवदर्शन महोत्सव समिती स्थापन केली असून या समितीचे कौशल्य विकास मंत्री मंगलप्रभात लोढा अध्यक्ष आहेत. मानव कल्याण यासंदर्भातील पंडित दीनदयाळ उपाध्याय यांचे मौलिक विचार समाजात रुजावेत या उद्देशाने देशभरात पंडित दीनदयाळ उपाध्याय मानव एकात्म हीरक महोत्सव साजरा होणार आहे. देशभरात या महोत्सवाला सुरुवात करणारे महाराष्ट्र हे पहिले राज्य असल्याची माहिती कौशल्य विकास मंत्री लोढा यांनी या बैठकीत दिली.

पंडित दीनदयाळ उपाध्याय यांचे कार्य, विचार प्रणाली, एकात्म मानवदर्शन आदि बाबतची माहिती विद्यार्थ्यांपर्यंत पोहचावी यासाठी प्रत्येक जिल्ह्यात पंडितजींच्या विचारांवर आधारित एक लाख पुस्तिकांचे वितरण करण्यात येणार आहे. या महोत्सवात ग्रामीण भागात बचतगट, अंगणवाड्या आणि शाळांमध्ये कौशल्य विकासावर भर देण्यात येणार आहे. तसेच गावातील स्वच्छता विषयक उपक्रम, घनकचऱ्याची विल्हेवाट लावण्याबाबत योजना तयार करण्याच्या सूचनाही जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आल्या आहेत. समाजातील शेवटच्या घटकांपर्यंत शासकीय योजना पोहचवण्यासाठी या महोत्सवात युद्ध पातळीवर प्रयत्न करण्याच्या सूचना मंत्री लोढा यांनी यावेळी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या. या महोत्सवात महिला व बाल विकास, शालेय शिक्षण, ग्रामविकास, सांस्कृतिक कार्य, आदिवासी विकास, पर्यावरण, पर्यटन या विभागाकडूनही या महोत्सवात विविध कार्यक्रमाद्वारे योगदान दिले जाणार आहे.

## ब्रेक फेल झाल्यांने वानिवली येथे वाहतुक कोंडी

**खोपोली: प्रतिनिधी**

सावरोली – खारपाडा या मार्गावर वानिवली येथिल चढण आपघाताला निमंत्रण देत आहे. एका बाजूंनी तिव्र उतरण तसेच चढण असल्यामुळे या ठिकाणी सातत्याने आपघात घडल्यांचे समोर येत असतांना याकडे दुर्लक्ष केल्यामुळे अवजड वाहने तिव्र वेगाने खाली येत असल्यामुळे अपघातांची दाट शक्यता वर्तविली जात आहे.

बुधवारी दुपारी एका वहानांचा ब्रेक फेल झाल्यामुळे चढण वरती थांबविण्यांत आले. त्यामुळे वाहतुकीची कोंडी होउन वहानांच्या लांबच लांब रांगा पहावयांस मिळाल्या. रणरणत्या उन्हामध्ये थांबावे लागल्यामुळे वाहन चालकांस मनस्ताप सहन करावा लागला.या मार्गावर औद्योगिकरणामुळे वाहानांची संख्या वाढत चालली आहे. नियंत्रण सुटल्याने वाहानांस आपघात होत आहे.खोपोलीकडे जात असतांना वानिवली येथे येताच त्यांना तिव्र चढणचा सामना करावा लागत आहे.या ठिकाणी मोठा अपघात होण्यांची शक्यता आहे.



## तमाशा व कलाकेंद्र कलावंतांच्या तक्रारी निवारणासाठी समिती गठीत

### गणेश चंदनशिवे आणि खंडुराज गायकवाड यांचा समावेश

**मुंबई, : प्रतिनिधी**

राज्यातील तमाशा आणि कलाकेंद्र कलावंतांच्या विविध तक्रारींचे निवारण करण्यासाठी दोन स्वतंत्र समित्यांच्या गठनाचा निर्णय सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार यांनी घेतला आहे. या समित्या तमाशा आणि कलाकेंद्र क्षेत्रातील फडमालक, कलाकार, वादक यांच्यासमोरील समस्या समजून घेऊन, पारंपरिक लोककला टिकवून ठेवण्यासाठी उपाययोजना सुचवतील, अशी माहिती मंत्री ॲड.शेलार यांनी दिली.




तमाशा तक्रार निवारण समितीमध्ये सांस्कृतिक कार्य संचालनालयाचे संचालक हे अध्यक्ष असणार असून, तमाशा फड मालक रघुवीर खेडकर, तमाशा फड मालक गोपाळ नाना शेषेराव, फड मालक संभाजी जाधव, कलाकार मंगलाताई बनसोडे, कलाकार अतांबर तात्या शिरढोणकर, अभ्यासक गणेश चंदनशिवे, अभ्यासक खंडुराज गायकवाड व सहसंचालक सदस्य म्हणून काम पाहतील.

कलाकेंद्र तक्रार निवारण समितीमध्ये संचालक सांस्कृतिक कार्य हे अध्यक्ष असणार असून, कलाकेंद्र मालक बाळासाहेब काळे, कलाकेंद्र मालक अभिजित काळे, कलाकार रेश्मा परितेकर, कलाकार सुरेखा पुणेकर, कलाकार प्रमिला लोदगेकर, कलाकार संघटनेचे धोंडीराम जावळे, अभ्यासक प्रकाश खांडगे व सहसंचालक हे सदस्य म्हणून असतील. या समित्यांचा कार्यकाळ ३० दिवसांचा असणार आहे

## कांदळवनांनी पर्यावरणाचे रक्षण; खाडीभागातील मासळीत वाढ

**तळा : प्रतिनिधी**

तळा तालुक्यातील खाडी किनारी भागात कांदळवनांमुळे अनेक प्रकारे पर्यावरण संरक्षणासाठी मदत होत आहे .खाडीभागात मच्छीत वाढ होतांना दिसते आहे त्यामुळे कांदळवनाचे संवर्धन करणे गरजेचे आहे .



तळा तालुक्यातील राजापुरी खाडीचा रहाटाड हा एक महत्वाचा जैविक परिसर आहे. येथील खाजण वन हे अनेक सागरी जीवांचे आधार आहेत. यापासून खाडी किनारी असणाऱ्या शेतीलाही फायदा होत असून भरतीचे खाऱ्या पाण्यापासून संरक्षण होण्यास मदत होत असते. तसेच मान्सूनपूर्व पाऊस सुरूझाले की या खाजण क्षेत्रातील कुजलेल्या पानांवर जाळीसारख्या पसरलेल्या मुळांमध्ये विविध प्रकारचे मासे , कोलंबी , खेकडे , शंख , बोईट , जिताडा इत्यादी माशांचे प्रकार प्रजाननाच्या वेळी जून जुलै महिन्यात येत असतात त्या ठिकाणी त्यांचे संवर्धन व संरक्षण चांगल्या प्रकारे होत असते.

स्थानिक नागरीक या भागातील वृक्षांची तोड करून सरपणासाठी लाकडे वापरतअसल्याने ही कांदळवने नष्ट होण्याच्या मार्गावर आहेत त्यामुळे सागरी जीवांना प्रजननाच्या कालावधीत सुरक्षितेच्या दृष्टीने या सागरी जीवांवरती संकट ओढवल्याचे चित्र पहावयास मिळत होते काही माशांच्या प्रजाती कमी होऊन या भागात नष्टच होतात कि काय असा प्रश्न निर्माण होऊन संकट ओढवण्याची भिती कोळी बांधव व तज्ञ मंडळी वर्तवत आहेत

सन १९१४–१९१५ या वर्षात वनविभागा मार्फत रहाटाड येथील दुर्लक्षित कांदळवनांच्या भागात लक्ष घालून माणगाव वन परिक्षेत्रातील तळा तालुक्यातील रहाटाड येथील खाजण क्षेत्रात डूंबी , चिपी , खारफुटी , तीवर इत्यादी प्रकारच्या रोपांची मोठ्या प्रमाणात लागवड केली होती त्याच बरोबर पूर्वीचीही वृक्ष होती आज हा क्षेत्र हिरवागार दिसत असून वृक्षांची चांगल्या प्रकारे वाढ झाली आहे हे खाजण वनक्षेत्र चांगल्या प्रकारे वाढ झाली असल्याने प्रजानन काळात विविध माशांना अंडी घालण्यासाठी चांगल्या प्रकारचे क्षेत्र निर्माण झाल्याने माशांच्या प्रजाती वाढून या भागातील खाडी क्षेत्रात मच्छीत वाढ होऊन कोळीबांधवाना व मच्छीमारांना याचा फायदा होईल

मात्र यापुढे कांदळवनांतील रोपांची लागवड व सवंर्धन केले तर हा जैविक परिसर असल्याने जीव वाढण्यास मदत होईल. त्यासाठी वनविभागाने या कांदळवनांतील वृक्षतोड होऊ नये याकडे लक्ष देण्याची आवश्यकता आहे.कांदळवणे वाढीमुळे जमिनीचीही धूप थांबते अशा विविध प्रकाराने कांदळवनांमुळे पर्यावरणाचे रक्षण होत असते.

कांदळवनांचे जंगल निर्जीव, निष्क्रिय किंवा पडीक वाटत असले तरी पर्यावरणीय परिसंस्थेचे चक्र सुरळीत ठेवण्यासाठी कांदळवनांच्या जंगलांचा मोठा वाटा आहे.

## पनवेलमध्ये परिणीता सन्मान पुरस्कार वितरण सोहळा

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

परिणीता सोशल फाऊंडेशन या महाराष्ट्रातील प्रसिद्ध एनजीओचा 'परिणीता सन्मान' पुरस्कार वितरण सोहळा आद्यक्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृह, पनवेल या नाट्यगृहात आयोजित करण्यात आला होता.

या कार्यक्रमासाठी राज्याचे उद्योग मंत्री उदयजी सामंत, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, बँक ऑफ महाराष्ट्रच्या पनवेल शाखेचे एजीएम संजीत कुमार, अमरधाम इंडस्ट्रीजचे विजय लोखंडे, माधवबाग, खोपोलीच्या संचालिका डॉ. दिपाली देशमुख, जवाहर इंडस्ट्रीजचे कार्याध्यक्ष स्वप्निल गुप्ते, अल्ट्रा लुब्रिकंटचे सिद्धेश सावंत, ॲड. प्रथमेश सोमण, श्रीनाथ बिल्डर्सचे संचालक प्रशांत गायकवाड, भावना मोटर्सच्या अपर्णा शाह, सामाजिक कार्यकर्त्या आणि टीआयपीलच्या संचालिका अर्चना परेश ठाकूर, लिली व्हॅलीच्या मीनल पटवर्धन, पुण्याच्या उद्योजिका प्रीती मुतालीक परिणीता संस्थेच्या संस्थापिका साक्षी सागवेकर आणि संस्थापक प्रशांत सागवेकर, परिणीता सन्मानचे सोहळा प्रमुख प्रसाद हनुमंते आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचं सूत्रसंचालन डॉ. मृण्मयी भजक यांनी केलं.

या पुरस्कार सोहळ्यात राज्याचे उद्योग तथा राजभाषा मंत्री मा. उदयजी सामंत यांना उद्योग गुरु पुरस्कारानं सन्मानीत करण्यात आलं. पनवेलचे शिल्पकार, लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते मंत्री सामंतांना गौरवण्यात आलं.

या वेळी लोकनेते रामशेठ ठाकूर म्हणाले, 'स्त्रीयांच्या कर्तृत्वाचा हा सोहळा खरच कौतुकास्पद आहे. वेगवेगळ्या क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या या महिलांचं कार्य मोठं आहे. या सोहळ्याला उपस्थित राहताना मला आनंद होत आहे. तसेच राज्याच्या उद्योग मंत्र्यांचा सत्कार करण्याची संधी मला मिळाली त्याचाही आनंद वाटला. परिणीता सोशल फाऊंडेशनच्या या कार्याला मी शुभेच्छा देतो '

यांचा आदर्श परिणीता पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला. राज्याचे उद्योग तथा राजभाषा मंत्री उदयजी सामंत यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. या कार्यक्रमाच्या स्वागतस्थळी नवी मुंबईतील सुप्रसिद्ध रांगोळीकार मिताली सुर्वे यांनी काढलेली परिणीता सन्मानची रांगोळी चर्चेचा विषय बनली होती.

## तुपगाव ग्रामपंचायत उपसरपंचपदी सचिन साखरे बिनविरोध

**चौक : प्रतिनिधी**

ग्रुप ग्रामपंचायत तुपगाव उपसरपंचपदी सचिन साखरे यांची बिनविरोध निवड झाल्याने त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. आमदार महेश बालदी यांनी ही भ्रमणध्वनीवरून शुभेच्छा दिल्या.

ग्रुप ग्रामपंचायत तुपगाव उपसरपंच सुयोग भालेकर यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिल्याने उपसरपंचपद रिक्त झाले होते. आज थेट सरपंच व निवडणूक निर्णय अधिकारी रविंद्र कुंभार यांच्या अध्यक्षतेखाली आज ग्राम पंचायत कार्यालयात विशेष सभा आयोजित करण्यात आली होती. सदस्य सचिन साखरे यांचा उपसरपंच पदासाठी एकमेव उमेदवारी अर्ज आला. एकमेव अर्ज आल्याने निवडणूक निर्णय अधिकारी रविंद्र कुंभार यांनी त्यांची बिनविरोध निवड झाल्याचे जाहीर केल्यावर त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव करण्यात आला.

आमदार महेश बालदी यांनी भ्रमण ध्वनी वरून शुभेच्छा दिल्या. यावेळी भारतीय जनता पक्षाचे स्थानिक नेते मोठ्या प्रमाणात उपस्थित होते. सरपंच रविंद्र कुंभार यांच्यासह अनेक कार्यकर्त्यांनीं त्यांचे अभिनंदन केले.



## कर्जत एसटी आगारात भीमजयंती उत्साहात

**कर्जत : प्रतिनिधी**

भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची १३४ वी जयंती रायगड विभागातील कर्जतळ आगारामध्ये अत्यंत मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. या वेळी विद्यार्थ्यांसाठी निबंध स्पर्धा आयोजित केली होती.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आगार प्रमुख चेतन देवधर तर प्रमुख पाहुणे म्हणून अँड. कैलास मोरे, भिसेगावचे पोलीस पाटील संजय हजारे, कोकण एसटी प्रेमी ग्रुपचे सदस्य फरहान होडेकर, सहाय्यक वाहतूक अधिक्षक देवानंद मोरे, स.वा. नि. पालवे, दीपक देशमुख, हरिश्चंद्र छत्तीसकर इत्यादी उपस्थित होते यावेळी प्रासंगिक मनोगत व्यक्त करतांना अँड. मोरे म्हणाले की, महामानव हे



सर्वांना सोबत घेऊन चालणारे व्यासपीठ आहेत. आपण सर्वांनी त्यांच्या विचारसरणीनुसार मार्गक्रमण केले पाहिजे.

याप्रसंगी सामान्य ज्ञान स्पर्धा परीक्षेचे आयोजन करण्यात आले होते.या स्पर्धेत सिद्धी शशिकांत शिंदे, शर्विल विशाल गेडाम, धनश्री विश्वनाथ वाघ, केदार रेवाप्पा वैरागकर, प्रणव विश्वनाथ वाघ, सायली सदाशिव वारे,अभिजित दिनकर तोंडे, प्रियांशी विशाल गेडाम, माधवी विजय गायकवाड, सिद्धी शशिकांत शिंदे, प्रणव धनाजी खाडे, प्रणिता धनाजी खाडे, प्रेम रोहिदास गावडे, प्रणव रोहिदास गावडे, अमर हनुमंत मेश्राम, प्रांजल प्रविण खैरे, आकांक्षा विलास बागुल, निल प्रशांत शिंदे, अनुजा दिनकर तोंडे, यंश भरकले यांनी प्राविण्य मिळवले.

याप्रसंगी अतुल सोनवणे, मोहन घोटकर, सुरेश आडसुळे, मिठ्ठू आंधळे, शशिकांत शिंदे, प्रविण खैरे, विशाल गेडाम, रोहिदास गावडे यांनी परिश्रम घेतले. सुत्रसंचालन रमेश जाधव यांनी केले.

पान १ वरुन

## सरकारद्वारे शेतकऱ्यांच्या जीवनात परिवर्तन होणार

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, २०२२ मध्ये जलसंपदा विभागाचा कार्यभार स्विकारल्यानंतर शेतकरी बांधवांना सानुग्रह अनुदान देण्याचा निर्णय घेतला व आज अनुदान वाटप सुरू झाले. अन्याय होत असेल तर अन्याय करणारा कायदा बदलला पाहिजे, अन्याय दूर करुन न्याय करणे हेच राज्यकर्त्यांचे काम आहे, असे छत्रपती शिवाजी महाराज यांनी सांगितले होते आणि तेच आपले महायुती सरकार करत आहे, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले. तसेच प्रकल्पग्रस्तांसाठी स्वतंत्र महामंडळ आपल्या महायुती सरकारने सुरू केले आहे. त्या माध्यमातून प्रकल्पग्रस्तांच्या मुलांना कर्ज देऊन त्यांनाही आपल्या पायांवर उभे करण्यासाठी राज्य सरकार प्रयत्नशील असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.

या परिसरातील शेतकरी बांधवांच्या जीवनात राज्य सरकारद्वारे सुरू असलेल्या विविध योजनांच्या माध्यमातून परिवर्तन घडेल, असा विश्वास मुख्यमंत्री फडणवीस यांनी व्यक्त केला.

## मुंबई ते नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ मेट्रोने जोडणार

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

नवी मुंबईतील वाढत्या लोकसंख्येला सार्वजनिक परिवहनाचा नवीन पर्याय म्हणून नवी मुंबई मेट्रो प्रकल्प पुढे आला. मुंबई ते नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ मेट्रोने जोडणे हा नवी मुंबई मेट्रो प्रकल्पाचा प्रमुख उद्देश आहे.

सिडकोतर्फे मेट्रो मार्ग क्र. ८ हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प नियोजित असून या मार्गाद्वारे छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ आणि नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळादरम्यान कनेक्टिव्हिटी प्रस्थापित होणार आहे.

सिडकोतर्फे एकूण २५ कि.मी. लांबीच्या मेट्रो मार्गाची अंमलबजावणी विविध टप्प्यांमध्ये करण्याचे नियोजित असून यांपैकी पहिल्या टप्प्यातील सीबीडी बेलापूर ते पेंधर (मेट्रो मार्ग क्र. १) मार्गावर नोव्हेंबर २०२३ पासून प्रवासी वाहतूक सुरू झाली आहे.

मुंबई महानगर प्रदेशामध्ये या मार्गाची लांबी ३५ कि.मी. असणार आहे. मेट्रो मार्ग क्र. ८ छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ टी–२ टर्मिनल स्थानकापासून सुरू होऊन मुंबई विमानतळ ते छेडा नगर दरम्यान हा मार्ग भूमिगत असणार असून पुढे नमुंआंवि पर्यंत उन्नत स्वरूपाचा असणार आहे. कुर्ला, एलटीटी, मानखुर्द, वाशी, नेरूळ आणि बेलापूर या महत्त्वाच्या शहरांच्या बाजूने हा मार्ग जाणार आहे.

## खारघरच्या हिरानंदानी ओव्हरब्रिजवर दुभाजक बसविण्याची मागणी

**खारघर : रामप्रहर वृत्त**

खारघर येथिल हिरानंदानी ओव्हरब्रिजवर दुभाजक बसविण्याची मागणी भारतीय जनता पक्षा तर्फे उत्तर रायगड चिटणिस ब्रिजेश पटेल यांनी पत्राद्वारे सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्र राजे भोसले यांचेकडे केली आहे.

त्यांनी आपल्या पत्रात हिरानंदानी ओव्हरब्रिज हा परिसरातील रहिवासी आणि प्रवाशांसाठी एक महत्त्वाचा कनेक्टिव्हिटी पॉइंट आहे. तथापि, दुभाजक नसल्यामुळे विशेषत: गर्दीच्या वेळेत धोकादायक परिस्थिती निर्माण झाली आहे. भरधाव वेगाने जाणारी वाहने, अपुऱ्या प्रकाशामुळे अनेक अपघात झाले आहेत.त्यामुळे प्रवाशांच्या सुरक्षिततेला मोठा धोका निर्माण झाला आहे.

यामुळे हिरानंदानी ओव्हरब्रिजवर दुभाजक बसवण्याचा विचार तुमच्या विभागाने करावा अशी मागणी ब्रिजेश पटेल यांनी सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्र राजे भोसले यांचेकडे केली आहे.

## मालमत्ता कर प्रकरणात पनवेल महापालिकेचे पारडे जड

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिका अंतर्गत तळोजा एमआयडीसी क्षेत्रातील दिपक फर्टिलायजर यांची मालमत्ता कराच्या नोटिस विरोधात मा.उच्च न्यायालयात रिट याचिका फेटाळल्यानंतर त्यांनी सर्वोच्च न्यायालयात विशेष अनुमती याचिका दाखल केली होती. मात्र दिनांक १५ एप्रिलच्या सुनावणीमध्ये सर्वोच्च न्यायालयानेही त्यांची याचिका फेटाळली असून त्यामुळे महापालिकेचे पुढील प्रक्रियेचे पुढील सर्व मार्ग खुले झाले आहेत.

दिपक फर्टिलायजर यांच्या सदर प्रकरणाचा परिणाम तळोजा एमआयडीसीमधील इतर औद्योगिक कंपन्यांवर होणार असल्याने आयुक्त मंगेश चितळे यांनी अतिरिक्त आयुक्त गणेश शेटे व उपायुक्त स्वरूप खारगे यांना सर्वोच्च न्यायालयात प्रत्यक्ष उपस्थित राहण्यास सांगितले. त्यानुसार आयुक्त मंगेश चितळे व अतिरिक्त आयुक्त गणेश शेटे यांच्या मार्गदर्शनाखाली उपायुक्त स्वरूप खारगे यांनी दिपक फर्टिलायजर कंपनीशी संबंधित ग्रामपंचायतकालीन व महापालिका स्थापनेनंतर अशा संबंधित कागदपत्रांची पद्धतशीर मांडणी केली.

या प्रकरणात दीपक फर्टिलायजर यांचे तर्फे सर्वोच्च न्यायालयातील प्रसिद्ध वरिष्ठ अभीयोक्ता कपिल सिब्बल यांनी बाजू मांडली. पनवेल महानगरपालिकेतर्फे भारताचे सॉलिसिटर जनरल तुषार मेहता, वरिष्ठ अभीयोक्ता पटवालिया, सुधांशू चौधरी व सम्राट शिंदे यांनी बाजू मांडली.

सर्वोच्च न्यायालयाचे द्वि सदस्यीय खंडपीठाचे न्यायमूर्ती श्रीमती बी. व्ही. नागरत्ना व श्री. सतीश चंद्र शर्मा यांनी दीपक फर्टिलायजरला कोणताही दिलासा किंवा स्थगिती देण्यास नकार दिला. तसेच कोणतीही शिथिलता हवी असेल तर उच्च न्यायालयातच अर्ज करण्याबाबत निर्देश देऊन त्यांची याचिका फेटाळून लावली.

सदर निर्णयाचा परिणाम तळोजा एमआयडीसीतील इतर कंपन्यांवर होणार असल्याने महापालिकेसह तळोजा एमआयडीसीमधील सर्वांचे या सुनावणीवर लक्ष लागून होते.

## निवडक

### घरातून दिड लाखांची चोरी

**पनवेल :** राहत्या घरातून अज्ञात चोरट्यांनी जवळपास दिड लाख रुपये किंमतीच्या ऐवजाची चोरी केल्याची घटना पनवेल शहरात घडली आहे. मनोज आरिवले हे परिगंधा सोसायटी येथे राहत असून त्यांच्या घरातून खुल्या दरवाजातून अज्ञात चोरट्याने आत प्रवेश करून राहत्या घरातील हॉलमध्ये टीपॉयवर ठेवलेल्या निकॉन कॅमेरा लेन्स, बॅटरी चार्जर असा मिळून जवळपास दिड लाख रुपये किंमतीचा ऐवज अज्ञात चोरट्याने चोरुन नेल्याने याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

### हेदुटणे येथून दुचाकीची चोरी

**पनवेल :** तालुक्यातील हेदुटणे येथून अॅक्टीव्हा स्कूटी गाडीची चोरी अज्ञात चोरट्याने केल्याने घटना घडली आहे. राजेशकुमार सिंग (वय ४६) यांनी त्यांची अॅक्टीव्हा स्कूटी गाडी (एमएच-४६-एएन-७३३३) रेड मेटा जवळपास ३० हजार रुपये किंमतीची ही हेदुटणे येथील बिल्डींगच्या पार्कीगमध्ये उभी करून ठेवली असता अज्ञात चोरट्याने चोरुन नेल्याने याबाबतची तक्रार पनवेल तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

### डी.एन.मिश्रा यांची नियुक्ती



**पनवेल :** हिंदु हृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या आशिर्वादाने व शिवसेना मुख्य नेते व उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या आदेशानुसार शिवसेना पक्षाच्या महानगर समन्वयकपदी (पनवेल महानगर) डी.एन.मिश्रा यांची नियुक्ती करण्यात आली असून त्यांना नियुक्तीपत्र खासदार श्रीरंग बारणे यांच्या हस्ते देण्यात आले. शिवसेना पक्षसचिव संजय मोरे यांनी ही नियुक्ती जाहीर केली असून त्यांचा नियुक्ती कालावधी एक वर्षाचा असणार आहे. या वेळी खासदार श्रीरंग आप्पा बारणे, जिल्हाप्रमुख रामदास शेवाळे, तालुकाप्रमुख रुपेश ठोंबरे, कळंबोली शहरप्रमुख तुकाराम सरक, कामोठे शहर प्रमुख सुनील गोवारी, खारघर शहरप्रमुख प्रसाद सावंत, उपशहरप्रमुख हेमंत सिंग आदी उपस्थित होते.

### नंदकिशोर भगत यांची निवड

**पनवेल :** रायगड जिल्हा ग्रामसेवक संघटनेत अतिशय



उत्कृष्ट काम करणाऱ्या नंदकिशोर भगत यांची २० संचालक असलेल्या रायगड जिल्हा ग्रामसेवक सहकारी पतसंस्थेच्या चेअरमनपदी बिनविरोध निवड करण्यात आली आहे. या त्यांच्या निवडीबद्दल सर्व स्तरांतून त्यांचे अभिनंदन होत आहे.


# पिरवाडी-माणकेश्वर कोस्टल रोडचे काम वेगात

## केगाव, एनएडी नेव्हीचा मार्ग होणार सुकर

**उरण : प्रतिनिधी**

पिरवाडी ते केगाव-माणकेश्वरला जोडणाऱ्या १०.५० कोटी खर्चाच्या कोस्टल रोडच्या पहिल्या टप्प्याचे काम दृष्टीपथात येऊ लागले असल्याची माहिती महाराष्ट्र मेरिटाईम बोर्डाचे कार्यकारी अभियंता सुधीर देवरे यांनी दिली.

महाराष्ट्र मेरिटाईम बंदर विभागाच्या अखत्यारीत दोन टप्प्यांत सुरू



असलेल्या १०.५० कोटी खर्चाच्या पिरवाडी-माणकेश्वर दरम्यानच्या सव्वा किमी लांबीच्या या रस्त्याच्या कामामुळे नेव्ही, केगावची वाहतूक अगदी सुकर होण्यास मदत होणार आहे. त्यामुळे वाहतूक कोंडीचा ताणही कमी होणार आहे.

सात मीटर रुंदीचा रस्ता पिरवाडी-माणकेश्वर दरम्यान किनाऱ्यावर समुद्रात दगडांचा भराव टाकून दोन टप्प्यांत करण्यात येणार आहे. पहिल्या टप्प्यात चार कोटी खर्चून ५५० मीटरचा रस्ता कामाला सुरुवात करण्यात आली आहे. तर दुसऱ्या टप्प्यात ६५० मीटर लांबीच्या रस्त्याचे काम करण्यात येणार आहे. दोन्ही टप्प्यांमध्ये होणाऱ्या कामावर सुमारे १०.५० कोटी खर्च अपेक्षित आहे. हा रस्ता डब्ल्यूबीएमने करण्यात येणार असून येत्या महिन्याभरात या कोस्टल रोडचे पहिल्या टप्प्याचे काम पूर्णत्वास जाईल अशी माहिती महाराष्ट्र मेरिटाईम बोर्डाने दिली.

सध्या पिरवाडी येथून केगाव येथे जाण्यासाठी पाच ते सहा किमीचे अंतर पार करावे लागते. हे अंतर दीड ते दोन किलोमीटरने कमी होणार आहे. याचा फायदा येथील नागरिकांनाही होणार आहे. हे काम जून २०२५ पर्यंत पूर्ण करण्याचा मानस असल्याची माहिती मेरीटाईम बोर्डाच्या अधिकाऱ्यांनी दिली.

# बारवई, ठोंबरेवाडीत रानगव्याचा संचार

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल तालुक्यातील बारवई, ठोंबरेवाडी परिसरात रानगवा मुक्तसंचार करत आहे. त्यामुळे येथील ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. वन विभागाने या रानगव्याचा बंदोबस्त करावा, अशी मागणी केली जात आहे.

पनवेल तालुक्यात पूर्वी मोठ्या प्रमाणात जंगल होते मात्र हे जंगल नामशेष होत चाललेले आहे. त्यामुळे वन्यजीव मानवी वस्तीत प्रवेश करत आहेत. यापूर्वी देखील



वन्यजीव मानवीवस्तीत प्रवेश करत असल्याच्या घटना घडल्या आहेत. नष्ट होणाऱ्या जंगलामुळे वन्यजीवांचे अधिवास धोक्यात आले आहे. अनेक ठिकाणी इमारतींचे कामे सुरू असल्याने वन्यजीवांचा अधिवास धोक्यात आला आहे. त्यामुळे बिबटे, वाघ, रानगवा, कोल्हे मानवी वस्तीत येऊ लागले आहेत.

खारघरमध्ये अनेक वेळा सोनेरी कोल्ह्याचे दर्शन झाले आहे. तर काही ठिकाणी बिबट्याचा वावर देखील दिसून आला आहे. या रानगव्याच्या गळ्यात एक दोर अडकला असून त्याद्वारे त्याला पकडण्याचा प्रयत्न करू नये असे आवाहन वनविभागातर्फे करण्यात आले आहे.

# अग्निशमन सेवा सप्ताहाचे आयोजन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

अग्निशमन सेवा सप्ताहाचे आयोजन १४ एप्रिल ते २० एप्रिल या कालावधीत करण्यात आले आहे. अग्निशमन विभाग विभागामार्फत मार्गदर्शक तत्त्वानुसार हा सप्ताह पाळण्यात येतो.

मुख्य दक्षता अधिकारी सुरेश मेंगडे यांच्या मार्गदर्शनाखाली मुख्य अग्निशामक अधिकारी विजय राणे, उपमुख्य अग्निशमन अधिकारी प्रवीण बोडखे यांनी सिडको महामंडळाच्या कार्यक्षेत्रात विविध जनजागृतीपर कार्यक्रमांचे आयोजन केलेले आहे. १४ एप्रिल रोजी शहीद जवानांना खारघर अग्निशामक केंद्र येथे श्रद्धांजली वाहण्यात आली.

१५ ते १९ एप्रिलदरम्यान रहिवासी इमारतींमध्ये, व्यावसायिक इमारतींमध्ये, रुग्णालयांमध्ये, शैक्षणिक इमारतींमध्ये आणि वेअर हाऊसमध्ये मॉकड्रिल घेण्यात येईल तर विविध रहिवासी सोसायटीमध्ये आगीपासून सुरक्षाबाबत घ्यावयाची काळजी याबाबत मार्गदर्शन शिबिरे तसेच प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आलेले आहे. २० एप्रिल रोजी मुंबई येथे सांगता समारंभ होणार आहे. लोकांमध्ये आगीच्या धोक्यांबाबत जनजागृती व्हावी तसेच इमारतीतील यंत्रणा कार्यान्वित ठेवून एखाद्या ठिकाणी आग लागलयास तत्काळ उपाययोजना करता यावी हा या कार्यक्रमाचा उद्देश आहे.

# करंजाडे परिसरातील शेकडो महिलांनी केला शिवसेनेत प्रवेश

**पनवेल : वार्ताहर**

खासदार श्रीरंग आप्पा बारणे यांच्या हस्ते करंजाडे येथील महिलांचा प्रवेश त्यांच्या कार्यालयात पनवेल येथे घेण्यात आला.

जिल्हाप्रमुख अतुल दादा भगत यांच्या आदेशानुसार मेघा सुनील दमडे रायगड जिल्हाप्रमुख (कार्यक्षेत्र उरण विधानसभा) यांच्या नेतृत्वाखाली करंजाडे येथील महिलांचा बाळाराम नाईक शिवसेना पनवेल तालुका संपर्कप्रमुख आणि करंजाडे व



वडघर विभाग प्रमुख नाथाभाऊ भरवाड यांच्या प्रयत्नानेआणि सहकार्याने प्रवेश घेण्यात आला.

या वेळी पनवेल जिल्हाप्रमुख रामदास शेवाळे, उपजिल्हाप्रमुख विनोद दादा साबळे, रघुनाथ दादा पाटील, पनवेल तालुकाप्रमुख (कार्यक्षेत्र उरण विधानसभा) पनवेल तालुका प्रमुख रुपेश ठोंबरे, दीपक ठाकूर, उरण तालुकाप्रमुख तृप्तीताई घरत, उरण उप तालुकाप्रमुख चाणजे विभाग प्रमुख अक्षय म्हात्रे आणि ज्येष्ठ नेते माजी सभापती उरण पंचायत समिती चंद्रकांत पाटील उपस्थित होते.

# सिडकोच्या गृहप्रकल्पाच्या दहाव्या मजल्यावर आग

**पनवेल :** तळोजा सेक्टर ३६ सुखसागर सोसायटीच्या १० माळ्यावर आग लागली. या आगीमध्ये जीवितहानी झाली नसली तरी दहाव्या मजल्यावर लागलेल्या आगीमुळे नागरिकांमध्ये एकच भीतीचे वातावरण पसरले होते. आगीचे नेमके कारण कळले नसून आग आटोक्यात आणण्यासाठी अग्निशमन दलाने प्रयत्न केले.

या आगीनंतर कळंबोली तसेच खारघर अग्निशमन यंत्रणेला पाचारण करण्यात आले. तळोजा खारघरला लागून असलेले हे शहर. या शहराची झपाट्याने वाढ होत आहे. सिडकोचे गृहप्रकल्प या ठिकाणी मोठ्या प्रमाणात उभारले जात आहेत. सिडकोने वसवलेल्या प्रमुख शहरांपैकी तळोजा हे भविष्यातील अत्याधुनिक शहर म्हणून ओळखले जाऊ लागत आहे, मात्र या शहरांमध्ये सर्व सोयीसुविधा होणे गरजेचे आहे. तळोजा विभागात अग्निशमन केंद्र उभारण्याची मागणी तळोजा फेडरेशनचे अध्यक्ष प्रसाद ढगे पाटील यांनी केली आहे.

# आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते 'प्रज्ञासूर्य' जयंती विशेषांकाचे प्रकाशन



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार विश्वरत्न बोधिसत्व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंती दिनाचे औचित्य साधून रसायनी येथील पत्रकार आनंद पवार यांनी प्रकाशित केलेल्या प्रज्ञासूर्य अंकाचे प्रकाशन पनवेलचे लोकप्रिय कार्यसम्राट आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते व महाराष्ट्राचे ख्यातनाम गायक साजन बेंद्रे व विशाल यांच्या प्रमुख उपस्थितीत नवीन पनवेल येथे पनवेल महानगर पालिकेचे माजी नगरसेवक अॅड. प्रकाश बिनेदार यांनी आयोजित केलेल्या भीम जयंती महोत्सवात करण्यात आले.

या प्रकाशन सोहळ्याला भाजपचे जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, पनवेल महानगरपालिकेचे माजी नगरसेवक तथा आंबेडकर चळवळीचे झुंजार नेते प्रकाश बिनेदार, माजी उपमहापौर चारुशीला घरत, माजी नगरसेविका दर्शना भोईर, कामगार नेते रवी नाईक, अविनाश गायकवाड, विनोद जोशी, ज्येष्ठ पत्रकार श्याम साळवी, ज्येष्ठ नेते सीसी भगत, एकनाथ माळी, नरेंद्र गायकवाड, मयूर मोहिते आदी उपस्थित होते.

पत्रकार आनंद पवार हे दरवर्षी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती दिनानिमित्त प्रज्ञासूर्य या विशेष अंकाच प्रकाशन करत असतात प्रज्ञासूर्य या जयंती विशेष अंकामध्ये डॉ.बाबासाहेबांच्या जीवनपटावर आधारित महाराष्ट्रातील नामवंत साहित्यिकांचे लेख कविता या प्रज्ञासूर्य अंकामध्ये प्रकाशित केले जातात. प्रज्ञासूर्य हा विशेषांक वाचकांसाठी लोकप्रिय ठरले असल्याची प्रतिक्रिया साहित्यिक लेखक व सामान्य वाचकांमधून व्यक्त होत आहे.

# उरण महाविद्यालयात भीमजयंती

**उरण : रामप्रहर वृत्त**

कोकण ज्ञानपीठ उरण वाणिज्य व कला महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने महाविद्यालयात भारतरत्न महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमात प्रमुख व्याख्याते म्हणून भूगोल विभाग प्रमुख प्रा. ए.के.गायकवाड उपस्थित होते.

महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. एम.जी. लोणे यांनी अध्यक्षीय समारोपात संविधान निर्मितीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे कार्य, भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील त्यांचे योगदान इत्यादी मुद्द्यांवर प्रकाश टाकला. कार्यक्रमात माजी प्राचार्य प्रा.के.ए.शामा, ज्येष्ठ प्रा. व्ही.एस इंदुलकर, कार्यालयीन अधीक्षक तानाजी घ्यार तसेच महाविद्यालयातील सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले.

सूत्रसंचालन राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. दत्ता हिंगमिरे यांनी केले तर तर उपस्थितांचे आभार अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक डॉ. ए.आर. चव्हाण यांनी व्यक्त केले. महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवन व कार्यावर प्रकाश टाकण्याच्या उद्देशाने कार्यक्रमाचे आयोजन महाविद्यालयात केले गेले.



# जांभळांचे भाव वाढले

## उरणच्या बाजारपेठेत ५०० रुपये किलो विक्री



### ....औषधी आणि गुणकारी

***उन्हाळ्यासह अनेक हंगामात येणाऱ्या रानमेव्याना बदलत्या वातावरणात औषधी आणि गुणकारी म्हणून अधिक मागणी असते. मात्र या रानमेव्याचे दर वर्षागणिक वाढू लागले आहेत. यात जांभूळ हे महत्त्वाचे व सध्याच्या परिस्थितीत वाढत्या मधुमेहींसाठी आवश्यक मानले जाते. या आजाराने ग्रस्त नागरिकांची संख्या झपाट्याने वाढू लागली आहे. त्यामुळे मागणीतही वाढ झाली आहे, मात्र चढे दर परडवत नसल्याने इच्छा व गरज असतांनाही अनेकांना यापासून वंचित राहावे लागत आहे.***

**उरण : प्रतिनिधी**

निसर्गाच्या ऋतू बदलानुसार जंगलात पिकणाऱ्या अनेक रानमेव्याची प्रतीक्षा असते. अशाच प्रकारे उन्हाळ्यात येणाऱ्या जांभळाचे आगमन झाले आहे, मात्र या जांभळांना प्रचंड दर आला आहे. जांभूळ सध्या १२० ते १४० रुपये पावकिलो म्हणजे तब्बल ५०० किलो पेक्षा अधिक वर पोहचले असून जंगल नष्ट होत असल्याने रानमेव्याचे भाव गगणाला भिडल्याचे दिसत आहे.अनेक ठिकाणी जांभूळ हे वाटीच्या मापाने विक्री केली जात आहे. या वाटीच्या मापात ही ५० रुपयांपेक्षा कमी दर नाही.

उन्हाळ्यात साधारणत: आंबा, करवंद,जांभूळसह इतर अनेक प्रकारचे रानमेवे बाजारात येतात. यात करवंद ही वधारली आहेत. त्यामुळे यावर्षी करवंदाच्या वाटीचेही दर चढे आहेत. वाढत्या उन्हाळ्यात या रानमेव्याना मागणी ही असते. साधारणत: २० ते २५ रुपये दरांच्या दरम्यान असलेल्या या रानमेव्यांचा आस्वाद घेतला जात होता, मात्र दरवर्षी रानमेव्याच्या या वाढत्या दरामुळे सर्वसामान्य नागरिक या स्वादापासून वंचित राहू लागले आहेत.

प्रदूषणामुळे फळावर मोठ्या प्रमाणात धूळ साचू लागली आहे. बाजारात आदिवासी आणि राज्य भरातून आलेल्या वेगळ्या प्रतीच्या व आकाराच्या जांभळांचे आगमन झाले आहे. यात उरणच्या आसपासच्या खेड्यातून आणि जंगलातून आणलेली जांभल शंभर रुपये पावकिलो आणि एपीएमसी मधून आलेली जांभळे १४० रुपये पावकिलोने विक्री केली जात आहेत.

# मोबाईल मालकांना सुपूर्द

**कामोठे : रामप्रहर वृत्त**

कामोठे पोलीस ठाण्याच्या हद्दीतून हरवलेले विविध कंपन्यांचे तब्बल ४२ मोबाईल फोन त्यांच्या मूळ मालकांना परत करण्यात आले आहेत. परिमंडळ २ चे पोलीस उप आयुक्त प्रशांत मोहिते आणि सहाय्यक पोलीस आयुक्त अशोक राजपूत यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक विमल बिडवे यांच्या हस्ते हे मोबाईल सुपूर्द करण्यात आले.

या जप्त केलेल्या मोबाईलची एकूण किंमत ७ लाख ७३ हजार रुपये आहे. पोलीस उपनिरीक्षक किरण राऊत, पोलीस हवालदार झोळ, पोलीस शिपाई कोकाटे, पोलीस शिपाई इलग आणि पोलीस शिपाई गायकवाड यांच्या पथकाने सीईआयआर पोर्टल आणि तांत्रिक तपासाच्या मदतीने हे हरवलेले मोबाईल विविध राज्यांतून शोधून काढले. वरिष्ठ पोलीस निरीक्षक विमल बिडवे यांच्या उपस्थितीत मंगळवारी हे मोबाईल फोन त्यांच्या मालकांना वाटप करण्यात आले. मोबाईल परत मिळाल्याने नागरिकांनी पोलिसांचे आभार मानले.

या यशस्वी कामगिरीबद्दल पोलीस उप आयुक्त प्रशांत मोहिते आणि सहाय्यक पोलीस आयुक्त अशोक राजपूत यांनी कामोठे पोलीस ठाण्याच्या टीमचे अभिनंदन केले आहे.



# पत्रकार उत्कर्ष समितीच्या जिल्हाध्यक्षपदी मिलिंद खारपाटील

## ◆ उरण तालुका अध्यक्षपदी पूजा चव्हाण

**उरण : बातमीदार**

पत्रकार उत्कर्ष समिती रायगड जिल्हाध्यक्षपदी मिलिंद खारपाटील यांची निवड करण्यात आली आहे. रविवारी शासकीय विश्रामगृह पनवेल येथे रायगड जिल्ह्यातील पत्रकार परिषदेत पत्रकार उत्कर्ष समितीचे महाराष्ट्र अध्यक्ष डॉ. अशोक म्हात्रे यांनी घोषणा करून त्यांना निवडपत्र दिले. तर उरण तालुका अध्यक्षपदी पत्रकार पूजा चव्हाण यांची सर्वानुमते निवड करण्यात आली आहे.



मिलिंद खारपाटील हे गेल्या ३६ वर्षे अनेक वृत्तपत्रात निर्भीडपणे पत्रकारितेचे काम करत आहेत. बुलंद आवाज, किनारपट्टी, रामप्रहर, कर्नाळा ,किल्ले रायगड , पुण्यनगरी, आपले साम्राज्य, कोकण टाइम्स, उरण टाईम्स आवाज कोकणचा या वृत्तपत्रात पत्रकार म्हणून, साप्ताहिक श्रमजीवीमध्ये सहसंपादक आणि साप्ताहिक श्रमशक्तीमध्ये त्यांनी कार्यकारी संपादक म्हणून काम केले आहे.

विविध सामाजिक संघटनाचे ते पदाधिकारी असून अनेक सामाजिक उपक्रमाची माहिती जनतेपर्यंत पोहचविण्याचे ते काम करत असतात. पत्रकारिता आणि गड किल्ले मोहीम यासाठी त्यांचा अनेक वेळा सन्मान झाला असून त्यांच्या निवडीचे संपूर्ण रायगड जिल्ह्यात अभिनंदन करण्यात येत आहे

समाजात घडणाऱ्या विविध विषयांवर आक्रमकपणे लिखाण करून सर्वसामान्यांना न्याय मिळवून देण्यासाठी आपल्या लेखणच्या माध्यमातून पूजा चव्हाण पत्रकारिता करत असतात.पूजा चव्हाण यांच्या या निवडीने समाजातील विविध स्तरातून त्यांच्यावर अभिनंदनचा वर्षाव होत आहे.

## संपादकीय

# शिक्षणातील राजकारण!


अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांचे कठोर टॅरिफ धोरण जगभरात गाजत असतानाच, ट्रम्प आणि अमेरिकेतील जगद्विख्यात हार्वर्ड विद्यापीठ यांच्यातील वादही आता जगभराचे लक्ष वेधून घेणारा ठरला आहे.

**अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्ष पदाचा कार्यभार स्वीकारल्यापासूनच डोनाल्ड ट्रम्प यांनी अमेरिकेतील विद्यापीठांवर ज्यूविरोधी विचारसरणीचा सामना करण्यासाठी दबाव टाकण्यास सुरूवात केली. याचाच भाग म्हणून अमेरिकेतील ज्यू विद्यार्थ्यांना संरक्षण देण्यात अपयश आल्याचा आरोप करत अमेरिकेतील काही विद्यापीठांच्या अध्यक्षांना प्रश्न विचारण्यात आले. अलीकडच्या काळात विद्यापीठांच्या कॅम्पसमध्ये शिक्षणात निर्माण झालेला व्यत्यय स्वीकारता येण्यासारखा नाही. प्रतिष्ठित विद्यापीठांनी ही समस्या गांभीर्याने घेण्याची गरज आहे. जर विद्यापीठांना करदात्यांकडून मिळणारी आर्थिक मदत मिळत रहावी असे वाटत असेल तर त्यांना कॅम्पसमध्ये योग्य बदल घडवून आणावेच लागतील अशी भूमिका ट्रम्प प्रशासनातील शिक्षण विभागाने घेतली. अलीकडच्या काही वर्षांमध्ये अमेरिकन सरकारकडून मिळणाऱ्या अनुदानाला न्याय देणाऱ्या बौद्धिक आणि नागरी अधिकारांच्या संदर्भातील अटी पूर्ण करण्यात हार्वर्ड विद्यापीठाला अपयश आले आहे, असेही या प्रतिष्ठित विद्यापीठाला सुनावण्यात आले. हार्वर्ड विद्यापीठ परिसरात ज्यूविरोधी भावना आणि भेदभाव दिसत आहे. या विरोधात पावले उचलण्यात यावी यासाठी ट्रम्प प्रशासनाने हार्वर्ड विद्यापीठाकडे मोठा बदल करण्यासंदर्भातील काही मागण्या अलीकडेच केल्या. यातून स्वाभाविकपणे सरकारला विद्यापीठावर मोठे नियंत्रण मिळाले असते. यापूर्वी याच मुद्यावर ट्रम्प प्रशासनाने कोलंबिया विद्यापीठाला अमेरिकी सरकारकडून दिले जात असलेले ४० कोटी डॉलर्सचे अनुदान थांबवले, परंतु त्यानंतर कोलंबिया विद्यापीठ सरकारशी चर्चा करण्यास तयार झाले. हार्वर्ड विद्यापीठाने मात्र अशा कोणत्याही चर्चेची गरज नसल्याचा आडमुठेपणाचा पवित्रा घेत ट्रम्प यांचा आदेश थेट धुडकावून लावला. ही एवढी हिंमत या विद्यापीठाच्या अध्यक्षांकडे कुठून आली हे समजून घेण्यासाठी हार्वर्ड विद्यापीठाची पार्श्वभूमी जाणून घ्यावी लागेल. १६३६ साली स्थापन झालेल्या हार्वर्ड विद्यापीठातून आजतागायत अमेरिकेचे आठ राष्ट्राध्यक्ष, अनेक तत्त्वज्ञ, वैज्ञानिक, नामवंत कवी, जागतिक स्तरावर नाव कमावणारे अमेरिकी व अन्य देशांतील नेते व उद्योजक यांनी शिक्षण घेतले आहे. मोजकीच नावे सांगायची झाल्यास, अमेरिकेचे माजी राष्ट्राध्यक्ष बराक ओबामा, तंत्रज्ञान जगतातील बडी नावे बिल गेट्स, मार्क झकरबर्ग, आपल्याकडील बडे उद्योजक रतन टाटा आदींचा उल्लेख करता येईल. जगभरातील शंभरहून अधिक देशांमध्ये या विद्यापीठाचे माजी विद्यार्थी आहेत. हार्वर्ड विद्यापीठ प्रशासनाला दहशतवादाला पाठिंबा देणारे, अमेरिकन मूल्यांना विरोध करणारे विद्यार्थी ओळखून त्यांची माहिती प्रशासनाला द्यावी लागेल. प्रवेश प्रक्रिया सुधारावी लागेल आदी मागण्या ट्रम्प प्रशासनाने केल्या होत्या, परंतु विद्यापीठाने या मागण्या घटनाविरोधी असून विद्यापीठाच्या स्वातंत्र्यावरील हल्ला आहे अशी भूमिका घेतली. या विद्यापीठातील विद्यार्थी इस्रायल–पॅलेस्टाइन संघर्ष असो, अभिव्यक्तीस्वातंत्र्य असो वा पारलैंगिकता, निरनिराळ्या मुद्यांवर सतत निदर्शने करत असतात. अशा निदर्शनांदरम्यान झालेल्या उल्लंघनांवर शिस्तभंगाची कारवाई व्हावी अशी ट्रम्प प्रशासनाची अपेक्षा होती. परंतु विद्यापीठाने सरकारपुढे झुकणार नाही असा पवित्रा घेतला. हार्वर्डच्या या आडमुठ्या भूमिकेमुळे ट्रम्प यांनी या विद्यापीठाला प्रशासनाकडून दिला जाणारा निधी रोखण्याचा निर्णय जाहीर केला आहे. निधीशिवाय हार्वर्ड आपला डोलारा कसा सांभाळते ते येत्या काळात दिसेलच, पण हार्वर्डसारखी विद्यापीठे राजकीय अजेंडा राबवतात ही अमेरिकी लोकांची धारणा या वादातून आणखी गडद होणार एवढे निश्चित.**

# वेव्हज् : मनोरंजनाची सर्वसमावेशक चळवळ

मनोरंजन व्यवसायात योगदान देणाऱ्या विविध घटकांना एका मंचावर आणून त्यांना परस्पर सहकार्याची आणि आधुनिक तंत्रज्ञानाच्या देवाण–घेवाणीची संधी उपलब्ध करून देणाऱ्या वेव्हज शिखर परिषद आणि व्हेज बाजाराविषयी...

भारत हा मनोरंजन आणि माध्यम उद्योग जगतातला एक आघाडीचा आणि तितकाच महत्त्वाचा देश. भारतात या उद्योग क्षेत्राची प्रगतीही तितक्याच झपाट्याने होत आहे आणि त्यासोबतच या परिसंस्थेच्या अवकाशात सातत्याने होत असलेल्या बदलांसह हे क्षेत्रही तितक्याच सातत्यपूर्णतेने बहरत चालले आहे. आज या क्षेत्राकडे नीट पाहिले तर विविध व्यासपीठांवरच्या आशय निर्मितीनेही मोठी उसळी घेतल्याचे दिसते. यामागचे कारण म्हणजे देशातील वाढत्या डिजिटल प्रसारण सेवा, प्रादेशिक भाषांमधील आशय सामग्री निर्मिती आणि सातत्याने नव्या, खिळवून ठेवणाऱ्या, सर्वसमावेशकतेची जाणीव करून देणाऱ्या आशयाची वाढती मागणी करत असलेला देशातला तंत्रज्ञानस्नेही प्रेक्षक वर्ग. त्यामुळेच तर आता भारतासाठी हे क्षेत्र केवळ मनोरंजनाचे साधन म्हणून मर्यादित राहिलेले नसून, हे भारतासाठी सांस्कृतिक अभिव्यक्ती, आर्थिक विकास आणि जागतिक पटलावर आपला प्रभाव पाडण्याचे एक सामर्थ्यशाली माध्यम झाले आहे. लवकरच मुंबईत जागतिक दृकश्राव्य मनोरंजन शिखर परिषद होणार आहे. येत्या १ ते ४ मे २०२५ दरम्यान महाराष्ट्रात, मुंबई इथे ही शिखर परिषद होणार आहे. महत्त्वाचे म्हणजे भारत सरकारनेच या परिषदेचे आयोजन केले आहे. ही परिषद जागतिक पटलावर भारताच्या वाढत्या महत्त्वाचे प्रतिबिंब असलेला एक मंच ठरणार आहे आणि वेव्हज बाजार हा या शिखर परिषदेअंतर्गतचाच एक अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. खरे तर गेल्या अनेक दशकांपासून मी या क्षेत्रातच जगतो, वावरतो आहे. या इतक्या प्रदीर्घ काळातील माझ्या स्वतःच्या अनुभवांवरून मी एक गोष्ट खात्रीने सांगू शकतो ती म्हणजे कथात्मक मांडणीत लोकांना एकत्र आणण्याची, त्यांना प्रेरित करण्याची आणि एकुणात परिवर्तन घडवून आणण्याची मोठी ताकद असते. याच पार्श्वभूमीवर वेव्हज आणि वेव्हज बाजाराच्या माध्यमातून भारताने जागतिक मनोरंजन क्षेत्रासाठी एका व्यापक सहकार्यपूर्ण भागीदारीचे आणि सर्वसमावेशक भविष्य घडवण्याच्या दिशेने पाऊल टाकले आहे.खरे




तर वेव्हज बाजार ही ऑनलाइन बाजारपेठेसाठी आखली गेलेली एक क्रांतिकारक संकल्पना आहे. ही ऑनलाइन बाजारपेठ म्हणजे जागतिक मनोरंजन परिसंस्थेअंतर्गतचे व्यावसायिक तज्ज्ञ, उद्योग – व्यवसाय, आणि कलाकारांना परस्परांसोबत जोडून देणारे माध्यम ठरणार आहे. या बाजारपेठेअंतर्गत या क्षेत्रातील परस्पर सहकार्य सुलभ करण्याचे उद्दिष्ट समोर ठेवले गेले आहे. याद्वारे या क्षेत्रातील व्यावसायिक तज्ज्ञांना नव्या संधी शोधण्याची आणि सहकार्यपूर्ण भागीदारी स्थापित करण्याची संधी मिळणार आहे. या बाजारपेठेला माध्यम आणि मनोरंजन क्षेत्रातील एक अभिनव व्यवसाय केंद्र म्हणून स्थान मिळवून देण्याचाच सरकारचा प्रयत्न आहे. भारताचे माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी २७ जानेवारी २०२५ रोजी या अभिनव बाजारपेठेचे औपचारिक उद्घाटन केले होते. आर्थिक क्षेत्रात दावोस शिखर परिषदेचे स्थान आहे, तेच मनोरंजन क्षेत्रात वेव्हज शिखर परिषदेला मिळवून देण्याचा दृष्टिकोन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मांडला होता. त्या दृष्टीने वेव्हज बाजार महत्त्वाचे साधन ठरणार आहे.

ही बाजारपेठ म्हणजे माध्यम आणि मनोरंजन क्षेत्राच्या अवकाशातील चित्रपट, दूरचित्रवाणी, ॲनिमेशन, गेमिंग, जाहिरात, वर्धित वास्तव (एक्स्टेंडेड रिॲलिटी), संगीत, ध्वनी संयोजन, नभोवाणी या आणि अशा विविध क्षेत्रांमधील भागधारकांना एकत्र आणणारे एक महत्त्वाचे व्यासपीठ ठरणार आहे. हे व्यासपीठ विक्रेते आणि खरेदीदारांतील दुवा ठरेल आणि त्याद्वारे व्यावसायिकांना आपली कौशल्ये सुलभतेने सादर करण्याची, त्यांच्या संभाव्य ग्राहकांसोबत थेट संपर्क साधण्याची आणि उपयुक्त सहकार्यपूर्ण भागीदारीची संधी उपलब्ध करून देत राहील.एखादा चित्रपट दिग्दर्शक आपल्या चित्रपटासाठी निर्मिती भागीदाराच्या शोधात असेल, एखादा जाहिरातदार योग्य व्यासपीठाच्या शोधात असेल, एखादा गेम डेव्हलपर गुंतवणूकदाराच्या शोधात असेल किंवा एखादा कलाकार आपल्या कलाकृतींना जागतिक स्तरावरील प्रेक्षकांसमोर सादर करू इच्छित असेल, तर अशा सर्वांसाठी वेव्हज बाजारपेठेचा हा मंच म्हणजे परस्पर संपर्क, सहकार्य आणि व्यवसायवृद्धीचे बहुआयामी व्यासपीठ उपलब्ध करून देणारी मोठी जागा किंवा बाजारपेठ असणार आहे.

एका अर्थाने वेव्हज बाजार ही एकप्रकारची समन्वित बीटूबी बैठकांची अभिनव बाजारपेठ आहे, जिने जागतिक मनोरंज क्षेत्रातील परस्पर संपर्क व्यवस्था, परस्पर सहकार्यपूर्ण भागीदारी व्यवस्था, आणि विकासाचा संपूर्ण चेहरामोहरा अगदी क्रांतिकारकरीत्या बदलला आहे. या बाजारपेठेने चित्रपट, दूरचित्रवाणी, संगीत, गेमिंग, ॲनिमेशन, जाहिरात तसेच वर्धित वास्तव (एक्स), आभासी वास्तव (व्हीआर) यांसारख्या जिवंत अनुभूती देणाऱ्या तंत्रज्ञानाशी संबंधित तज्ज्ञ व्यावसायिकांना एकत्र आणणारा मंच उपलब्ध करून दिला आहे. आणि याद्वारे विविध सर्जनशील क्षेत्रांसाठीच्या आशय सामग्रीचे सूचीकरण, त्याचा शोध आणि संबंधित व्यवहारांसाठीचाही एक व्यापक मंच उपलब्ध झाला आहे. चित्रपट वितरणासाठीचा मंचाच्या शोधात असलेले निर्माते, नव्या संकल्पना मांडू पाहणारे गेम डेव्हलपर किंवा लायसन्सिंग संधींच्या शोधात असलेले साऊंड डिझायनर अशा सगळ्यांसाठी वर्गवारीनुसार सूचीकरण, सुरक्षितपणे सादरीकरणे पाहण्याची दालने आणि संपर्क व्यवस्था उपलब्ध करून देत ही संपूर्ण प्रक्रिया सुलभ करणारी बाजारपेठ म्हणून वेव्हज बाजार उदयाला येणार आहे.

या बाजारपेठेच्या माध्यमातून भौगोलिक मर्यादांच्या पलीकडे जात विक्रेते आणि खरेदीदारांना त्यांच्यासाठीचा योग्य भागीदार आणि संधी शोधण्याच्या दृष्टीने सक्षम करणाऱ्या सुविधांचा अंतर्भाव केला आहे. चित्रपट स्टुडिओ, ॲनिमेशन हाऊस, पॉडकास्ट निर्माते, मार्केटिंग यंत्रणा यांसारख्या विक्रेत्यांना आपल्या सेवा आणि त्यांच्याकडची आशय सामग्री जागतिक गुंतवणूकदार, वितरक आणि भागीदारांसमोर सादर करण्याची संधी उपलब्ध झाली आहे. दुसरीकडे खरेदीदारांसाठीदेखील उच्च गुणवत्तेचे, आधुनिक काळाशी सुसंगत प्रकल्प या बाजारपेठेमुळे उपलब्ध होऊ लागले आहेत. त्याच वेळी गुंतवणूकदारांसाठीदेखील सहनिर्मितीच्या करारांची आणि व्यापक व्यावसायिक संधींची दारे खुली झाली आहेत. इथे आवर्जून उल्लेख करायला हवी अशी गोष्ट म्हणजे या व्यासपीठाला या उद्योग क्षेत्राशी संबंधित विशिष्ट उपक्रम, सादरीकरणे पाहण्याची दालने, गुंतवणूकदारांबरोबरच्या बैठका – चर्चा आणि कलाकृतींच्या थेट प्रक्षेपण सत्रांसारख्या लाइव्ह स्क्रीनिंगसारख्या उपक्रमांशी जोडले गेले आहे, यामुळे या व्यासपीठाच्या माध्यमातून केवळ आभासी संवादाच्या पलीकडे जात खऱ्या अर्थाने उपयुक्त असलेले करार आणि व्यवहार प्रत्यक्षात साकारले जातील याचीच सुनिश्चिती झाली आहे.

मुंबईत वांद्रे–कुर्ला संकुलात वेव्हज शिखर परिषद होणार असून त्यावेळी हा वेव्हज बाजारही साकारला जाणार आहे. यानिमित्ताने उपलब्ध करून दिलेल्या डिजिटल बाजारपेठेवर नोंदणी केलेल्या काही निवडक प्रतिनिधींना आपल्या संकल्पना मांडण्याची, या उद्योग क्षेत्रातील विविध घटकांसोबत संपर्क प्रस्थापित करण्याची, आणि व्यवहार पूर्णत्वाला नेण्याची मोठी संधी उपलब्ध करून दिली जाणार वेव्हज बाजार केवळ एक व्यासपीठ म्हणून मर्यादित राहिलेले नाही, तर ते अधिक स्मार्ट, परस्परांशी अधिक जोडलेले आणि जागतिक पातळीवरील सर्वसमावेशक मनोरंजन क्षेत्राच्या दिशेने सुरू झालेली चळवळच ठरले आहे.

एक कलाकार म्हणून, आम्ही कायमच आव्हानात्मक, प्रेरणादायी आणि चौकटीपलीकडे जाऊन विचार करायला लावणाऱ्या अवकाशाच्या शोधात असतो. वेव्हज हा अशाच प्रकारच्या अवकाशाच्या निर्मितीचा प्रयत्न आहे. दूरदृष्टीने सुरू केलेल्या या वाटचालीचा आपणही एक भाग असल्याचा मला खरोखरच अभिमान वाटतो. ही परिषद आपल्या परस्परांशी संपर्काच्या, कलाकृतींच्या निर्मितीच्या आणि मांडणीच्या पद्धतींमध्ये क्रांतिकारक बदल घडवून आणेल. हा बदल केवळ भारतापुरता मर्यादित नसेल तर त्याचा प्रभाव अवघ्या जगात दिसेल. ही परिषद म्हणजे भारतासाठीचा 'लगान' क्षण आहे. जगभरातील माध्यम आणि मनोरंजन क्षेत्रासाठी एकतेचा, धैर्याचा आणि एका अशा दृष्टिकोनाचा क्षण आहे, ज्याचा प्रतिध्वनी आपल्या सीमांच्याही पलीकडे ऐकू येत राहील.

**लेखक : आमिर खान,** अभिनेता आणि निर्माते



## बदलते तंत्रज्ञान

## डेटा संपला तरी सिम सुरूच; बीएसएनएलचा विशेष प्लॅन

खासगी टेलिकॉम ऑपरेटर्सनी त्यांच्या रिचार्ज प्लॅनच्या किमती वाढवल्यामुळे भारतातील लाखो मोबाईल युजर्स



अडचणीत सापडले आहेत, पण जिओ, एअरटेल व व्हीआय यांसारख्या कंपन्या चांगल्या सेवा देऊन युजर्सना जास्त पैसे मोजावे लागणार नाहीत याचीसुद्धा काळजी घेत आहेत. आता सर्वांचे लक्ष वेधून घेण्यासाठी सरकारी टेलिकॉम ऑपरेटर बीएसएनएलने त्यांच्या अत्यंत परवडणाऱ्या दीर्घ वैधतेच्या प्लॅनने मने जिंकलीत.

बीएसएनएल जुन्या आणि परवडणाऱ्या दरांमध्ये रिचार्ज प्लॅन घेऊन आली आहे. बीएसएनएलने फक्त ३९७ रुपयांचा १५० दिवसांच्या वैधतेचा प्लॅन लाँच केला आहे. नवीन ३९७ रुपयांचा प्लॅन केवळ दीर्घ वैधताच देत नाही, तर मोफत कॉलिंग, दैनिक डेटा व एसएमएस फायदेदेखील देतो.

बीएसएनएलच्या ३९७ रुपयांचा रिचार्ज प्लॅनमध्ये तुम्हाला काय मिळणार?

* अमर्यादित कॉलिंग : पहिल्या ३० दिवसांसाठी स्थानिक आणि एसटीडी नेटवर्कवर मोफत कॉल.
* दैनिक एसएमएस : ३० दिवसांसाठी दररोज १०० एसएमएस.
* हाय–स्पीड डेटा : पहिल्या ३० दिवसांसाठी २ जीबी/दिवस (एकूण ६० जीबी).
* एफयूपीनंतरचा स्पीड : दररोजच्या मर्यादेनंतर ४० केबीपीएस.

पहिल्या ३० दिवसांसाठी पूर्ण फायदे लागू असले तरी सिम १५० दिवसांसाठी सक्रिय राहते, जे कमीत कमी किमतीत त्यांचा नंबर ॲक्टिव्ह ठेवू इच्छिणाऱ्या युजर्ससाठी बेस्ट आहे.

ज्यांना रिचार्ज प्लॅनच्या संपूर्ण कालावधीसाठी डेटा लाभ हवा आहे त्यांच्यासाठी, बीएसएनएल १६० दिवसांचा ९९७ रुपयांचा रिचार्ज प्लॅन बेस्ट आहे. या प्लॅनमध्ये खालील गोष्टींचा समावेश असेल

* १६० दिवसांसाठी दररोज २ जीबी डेटा
* सर्व नेटवर्कवर अमर्यादित कॉलिंग
* दररोज १०० मोफत एसएमएस
* जास्त पैसे खर्च न करता दीर्घकालीन फायदे मिळविण्यासह दररोज डेटा हवा असलेल्या युजर्ससाठी हा एक उत्तम पर्याय आहे.

# विनोदी साहित्यिक वि.आ. बुवा

विनायक आदिनाथ बुवा हे मराठी भाषेतील विनोदी साहित्यिक होते. ते वि.आ. बुवा या नावाने प्रसिद्ध होते. त्यांनी आपल्या लेखनाचा प्रारंभ इ.स. १९५०मध्ये केला. त्यांची विनोदी शैलीतील एकूण १५०हून अधिक पुस्तकेत प्रसिद्ध झाली आहेत. त्यांनी विनोदी लेखनाबरोबरच आकाशवाणीवरील श्रुतिका, विनोदी निबंध, पटकथा, तमाशाच्या संहिता, विडंबने, एकांकिका असे विविध स्वरूपाचे लेखन केले आहे. त्यांचा आज स्मृतिदिन आहे.



### विशेष

वि.आ. बुवांचा जन्म पंढरपूर येथे ४ जुलै, इ.स. १९२६ रोजी झाला. त्यांचे शालेय शिक्षण त्यांनी पंढरपूर आणि मिरज येथे झाले. वडिलांच्या अकाली निधनामुळे शिक्षण अर्धवट राहिले. नोकरीसाठी ते कल्याण येथे स्थाईक झाले. मुंबई येथील व्हिक्टोरिया ज्युबिली टेक्निकल इन्सगटिट्यूटमध्ये बुवा यांनी रसायनशास्त्र विभागात इ.स. १९८६मध्ये निवृत्त होईपर्यंत नोकरी केली. बुवा यांचे वक्तृत्व उत्तम असल्याने व्याख्याने व कथा–कथनासाठी महाराष्ट्रासह अन्य राज्यांमध्येही त्यांनी दौरे केले होते. संस्कृत भाषेचा त्यांचा चांगला अभ्यास होता.

सुंदर हस्ताक्षराच्या जोरावर त्यांनी इ.स. १९५०मध्ये इंदुकला नावाचा एक हस्तलिखित साहित्याचा अंक प्रकाशित केला होता. हे हस्तलिखित दर्जेदार स्वरूपात असल्याने साहित्यिकांचा चांगला पाठिंबा यास मिळाला. अनंत काणेकर, महादेवशास्त्री जोशी, चिं. वि. जोशी, दुर्गा भागवत, माधव मनोहर, गो. नी. दांडेकर, शांता शेळके, वसंत बापट, विजय तेंडुलकर आणि द. मा. मिरासदार असे गाजलेले साहित्यिक या अंकासाठी लिखाण करत असत. पुढे नवशक्ती या वृत्तपत्राचे संपादक प्रभाकर पाध्ये यांनी त्यांना वृत्तपत्रातून लिखाणासाठी उद्युक्त केले आणि त्यांनी वृत्तपत्रातून विनोदी लेखनास प्रारंभ केला. सूक्ष्म निरीक्षणशक्ती, कल्पकता आणि उत्स्फूर्त विनोद ही वि. आ.बुवा यांच्या लेखणीची वैशिष्ट्ये मानली जातात. त्यानंतर हंस दिवाळी अंक, मोहिनी दिवाळी अंक, नवयुग दिवाळी अंक, आवाज दिवाळी अंक आणि कितीतरी मासिके व दिवाळी अंकांतून बुवा लेखन करू लागले. वि. आ. बुवा यांचा पहिला कथासंग्रह अकलेचे तारे इ.स. १९५३मध्ये प्रसिद्ध झाला. महाराष्ट्र शासनाच्या ग्रंथ आणि नाट्य पुरस्कार समित्यांवर अनेक वर्षे त्यांनी परीक्षक म्हणून काम पहिले होते. आकाशवाणीवर त्यांचे ६००हून अधिक कार्यक्रम प्रसारित झाले. त्या काळच्या पुन्हा प्रपंच या लोकप्रिय मालिकेसाठी ४००हून अधिक भागांचे लेखन त्यांनी केले. १७ एप्रिल २०११ रोजी त्यांचा मृत्यू झाला.

**मिळालेले पुरस्कार**

इ.स. १९७२मध्ये कल्याणमध्ये झालेल्या मराठी साहित्य संमेलनाचे स्वागताध्यक्ष म्हणून निवड, इ.स. १९८३ 'प्रेमाची एस्सो स्टाइल' या पुस्तकाला महाराष्ट्र शासनाचा उत्कृष्ट विनोदी साहित्यासाठीचा पुरस्कार, इ.स. १९९७ 'शंभरावे पुस्तक' या पुस्तकाला महाराष्ट्र शासनाचा उत्कृष्ट विनोदी साहित्यासाठीचा पुरस्कार, इ.स. १९९७ उत्कृष्ट विनोदी लेखक म्हणून मुंबई मराठी साहित्य संघाचा आचार्य अत्रे पुरस्कार. (साभार : विकीपीडिया)

### बातमीतील बात




## आरोग्य प्रहर

## दररोज ब्रेड खाल्ल्यास आरोग्यावर गंभीर परिणाम

अनेकांच्या सकाळच्या नाश्त्याची सुरुवात ब्रेड–बटर, ब्रेड–जाम, ब्रेड चहा/कॉफी आणि ब्रेड सँण्डविच खाल्ल्याने होते, पण ब्रेड कमीत कमी कमी करण्याचा प्रयत्न करा, कारण ब्रेड तुमच्या शरीरासाठी सर्वात धोकादायक गोष्ट असू शकते. डॉ. मिकी मेहता यांनी त्यांच्या इन्स्टाग्राम पोस्टच्या कॅप्शनमध्ये लिहिल्यानुसार दररोज ब्रेड खाल्ल्याने ऑटो–ब्रूअरी सिंड्रोम होऊ शकतो. ही एक दुर्मीळ स्थिती आहे, जी आतड्यातील मायक्रोबायोमला ब्रेडमध्ये आढळणाऱ्या कार्बोहायड्रेट्सपासून इथेनॉल जास्त प्रमाणात तयार करण्यास अनुमती देते, ज्यामुळे अल्कोहोलयुक्त पेय न घेताही नशेची लक्षणे दिसू शकतात.



बंगळुरू येथील एस्टर व्हाइटफील्ड हॉस्पिटलमधील इंटर्नल मेडिसिन कन्सल्टंट डॉ. बसवराज एस. कुंभार म्हणाले की, एबीएस किंवा ऑटो ब्रुअरी सिंड्रोम ही अशी स्थिती आहे, ज्यामध्ये आतड्यांमधील सूक्ष्मजीवांद्वारे कार्बोहायड्रेट्सच्या किण्वनामुळे शरीरात अल्कोहोल तयार होते, ज्यामुळे नशेची लक्षणे दिसतात. याला आतड्यांचे किण्वन सिंड्रोम, असेही म्हणतात आणि ही एक अत्यंत दुर्मीळ घटना आहे.

डॉ. कुंभार यांनी चक्कर येणे, तंद्री, गोंधळ, मूड स्विंग किंवा आक्रमकता यांसारख्या लक्षणांवर लक्ष ठेवण्याचा सल्ला दिला. काही प्रकरणांमध्ये रुग्णांना अतिसार व मळमळ होण्यासह पोट फुगणे आणि पोटदुखीही होऊ शकते. अशा वेळी तुम्ही वैद्यकीय तपासणी करू शकता.

दररोज ब्रेड खाल्ल्याने हा सिंड्रोम थेट होत नाही. एबीएस सामान्यतः अँटीबायोटिकचा अतिवापर, आतड्यांतील डिस्बिओसिस किंवा यीस्टच्या अतिवृद्धीला परवानगी देणाऱ्या रोगप्रतिकार शक्ती कमी करण्यासारख्या घटकांशी जोडलेला असतो. ब्रेडमध्ये यीस्ट आणि कार्बोहायड्रेट्स असतात, परंतु, तुमचे आरोग्य पूर्णपणे चांगले असल्यास ब्रेड दररोज खाल्ल्याने एबीएस होत नाही, ज्या व्यक्तींची रोगप्रतिकार शक्ती कमकुवत आहे अशा लोकांना हा आजार होण्याची दाट शक्यता असते.

सामान्य लोकांनी एबीएस टाळण्यासाठी ब्रेडचे सेवन मर्यादित करण्याची आवश्यकता नाही. नियमित आहाराचा भाग म्हणून ब्रेडचे सेवन कमी प्रमाणात करणे पूर्णपणे सुरक्षित आहे, अशी शिफारस डॉ. कुंभार यांनी केली. त्यांच्या मते, कार्बोहायड्रेट आणि साखर नियंत्रणावर लक्ष केंद्रित करून, या आजारावर उपचार करण्यास मदत मिळवू शकतो. त्यावर नियंत्रण ठेवू शकतो.

# रायगड जिल्ह्यात ४० टक्के पाणीसाठा उपलब्ध

## ढोकशेत ९ टक्के तर आंबेघर धरणात ७१ टक्के पाणीसाठा उपलब्ध



**रोहे : प्रतिनिधी**

उन्हाचा झळा वाढत असून सूर्यनारायण आग ओळखत असल्याचे चित्र रायगड जिल्हा दिसत आहेत त्यामुळे उष्णता वाढली आहे या वार्ता तापमानाचा परिणाम रायगड जिल्ह्यातील धरण क्षेत्रात होता दिसत आहे रायगड जिल्ह्यातील २८ धरणक्षेत्रात सध्या ३८.९४ टक्के पाणीसाठा उपलब्ध आहे.

रायगड जिल्ह्यात सर्वात कमी पाणीसाठा सुधागड तालुक्यातील ढोकशेत धरणक्षेत्रात ९ टक्के तर सर्वात जास्त पेण तालुक्यातील आंबेघर धरणक्षेत्रात ७१ टक्के पाणीसाठा उपलब्ध आहे. पाऊस चालू होण्यास अद्याप दोन महिने शिल्लक आहेत. हा पाणीसाठा २ महिने टिकवणे आवश्यक आहे.

रायगड पाटबंधारे विभाग कोलाड अंतर्गत येत असलेल्या २८ धरणातील पाणी साठा पाहता मुरुड तालुक्यातील फणसाड धरणक्षेत्रात ३७ टक्के पाणीसाठा उपलब्ध, तळा तालुक्यातील वावा धरण ५९ टक्के पाणीसाठा उपलब्ध, रोहा तालुक्यातील सुतारवाडी धरण ६० टक्के पाणीसाठा उपलब्ध, पेण तालुक्यातील आंबेघर धरण ७१ टक्के पाणीसाठा उपलब्ध, अलिबाग तालुक्यातील श्रीगाव धरण२३ टक्के पाणीसाठा उपलब्ध, सुधागड तालुक्यातील कोंडगाव धरण ३० टक्के पाणीसाठा उपलब्ध, घोटवडे धरण २० टक्के पाणीसाठा उपलब्ध, ढोकशेत धरण ९ टक्के पाणीसाठा उपलब्ध, कवेळे धरण २६ टक्के पाणीसाठा उपलब्ध, उन्हेरे धरण १७ टक्के पाणीसाठा उपलब्ध, श्रीवर्धन तालुक्यातील कार्ले धरण ४८ टक्के पाणीसाठा उपलब्ध, कुडकी धरणत ४१ टक्के पाणीसाठा उपलब्ध, रानीवली धरण १० टक्के पाणीसाठा उपलब्ध, म्हसळा तालुक्यातील पाभरे धरण ४९ टक्के पाणीसाठा उपलब्ध, संदेरी धरण ५८ टक्के पाणीसाठा उपलब्ध, महाड तालुक्यातील वरंध धरण ३० टक्के पाणीसाठा उपलब्ध, खिंडवाडी ३३ टक्के पाणीसाठा उपलब्ध, कोथुर्डे धरण१८ टक्के पाणीसाठा उपलब्ध, खैरे धरण ३२ टक्के पाणीसाठा उपलब्ध, कर्जत तालुक्यातील साळोख धरण ३४ टक्के पाणीसाठा उपलब्ध, अवसरे धरण५६ टक्के पाणीसाठा उपलब्ध, खालापूर तालुक्यातील भिलवले धरण ५९ टक्के पाणीसाठा उपलब्ध, कलोते मोकाशी धरण ४८ टक्के पाणीसाठा उपलब्ध, डोणवत धरण ३७ टक्के पाणीसाठा उपलब्ध, पनवेल तालुक्यातील मोरबे धरण ५३ टक्के पाणीसाठा उपलब्ध, बामणोली धरण ५७ टक्के पाणीसाठा उपलब्ध, उसरण धरण ५३ टक्के पाणीसाठा, उरण तालुक्यातील पुनाडे धरणत ५१ टक्के पाणीसाठा उपलब्ध आहे.

# रसायनीत भंगार गोळा करणाऱ्याला मारहाण

**खोपोली :** भंगार वेचणाऱ्या इसमाला चोर समजून जबर मारहाण करत डांबून ठेवल्या प्रकरणी धीरज सुभाष सोनावणे खाने आंबिवली खालापूर, स्वप्नील कांबळे कामार्ली पेण, तेजस गायकवाड चांभार्ली खालापूर या तिघां विरोधात रसायणी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

रसायनी पोलीस ठाणे हद्दीत दिनांक १३ एप्रिल रोजी संध्याकाळी साडेचार वाजणेच्या सुमारास शिंदेवाडी, मोहपाडा येथून इनामूल्लाह अब्दुल रहमान सुलमानी(वय३७) भंगार गोळा करून येत असताना तो चोरी करण्यास आले आहे असा गैरसमज करून धीरज याने सुलमानी याचे डोक्यात दारुची बाटली व स्टीलची उलथन मारली. स्वप्नील आणि तेजसने मारहाण करून शिवीगाळी करून एका खोलीत डांबून ठेवून जिवे ठार मारण्याची धमकी दिली.भंगार वेचणारा सुलमानी याने कशी बशी सुटका, करून घेत रसायनी पोलीस ठाणे गाठले.

तिघांविरूद्ध रसायनी पोलीस ठाण्यात तक्रार दिली असून याबाबत रसायनी पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**CHANGE OF PRACTICING ADDRESS**

Name = Dr Sandeepa L Patil
State* Reg No = GB- I -24241
Teacher's code = AYSV00659

I am currently practicing at Mandsaur Institute of Ayurvedic Education and Research,PO Mandsaur, Pin- 458001, Madhya Pradesh, since 19 April 2024.

## मोटार सायकल अपघातात एकाचा मृत्यू

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

रेवदंडा पोलीस ठाणे हद्दीत मौजे साळाव रोहा रोडवर शिरगाव गावचे हद्दीत, झालेल्या मोटार सायकल अपघातात मागे बसलेल्या एकाचा मृत्यू झाला.

मोटार सायकल चालविण्याचा परवाना नसताना मोटार सायकल वरून गावात फेरफटका मारण्यासाठी गेले असता साळाव रोहा रोडवर शिरगांवचे हद्दीत रस्त्याच परिस्थितीकडे दुर्लक्ष करुन मोटार सायकल अतिवेगाने व बेदरकारपणे चालविल्या मुळे मोटार सायकल स्लीप होउन मोटार सायकलवर मागे बसललेला तरुण खाली पडल्याने डोक्याला गंभीर स्वरूपाची दुखापतझाल्याने त्याचा मृत्यु झाला

## सावधान नोटीस

तमाम जनतेस या सावधान नोटीशीने कळविण्यांत येत आहे की, आमचे अशिल **श्री. पांडुरंग भाऊ गोजे** यांनी खालील वर्णनाच्या मिळकतींबाबत **पनवेल येथील दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांच्या न्यायालयात रे.मु.नं. १०७/२०१४ हा दावा श्री. वामन भाऊ गोजे वगैरे** यांच्या विरुध्द दाखल केलेला आहे. सदरचा दावा अद्याप न्यायप्रविष्ठ आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| गावाचे नाव | भुमापन नं./ हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर. चौ.मी. |
|---|---|---|
| मौजे–बारवई, ता. पनवेल, जि. रायगड. | १८ | ०–४२–०० |
| | २१ | ०–६१–५० |
| | २८ (नविन २८/१) | पुर्वीचे क्षेत्र ०–४१–०० (नविन क्षेत्र ०–३७–००) |
| | ११४ | ०–६६–८० |
| | ४ (नविन ४/१) | पुर्वीचे क्षेत्र ०–७१–६० (नविन क्षेत्र ०–५४–९०) |
| | ३५/१ | पुर्वीचे क्षेत्र ०–७३–३० (नविन क्षेत्र ०–६५–७०) |
| | ३७/१ब/१ | १–७५–०० |
| | ११९ | ०–२६–३० |
| | १२० | ०–१८–२० |
| पाली बु.।।, ता. पनवेल, जि. रायगड | ३८/२ | ०–६२–०० |

तरी या सावधान नोटीसीने तमाम जनतेस कळविण्यात येते की, वरील परिशिष्टात नमूद केलेल्या मिळकतीबाबत कोणीही **श्री. वामन भाऊ गोजे वगैरे** अथवा इतर कोणाशीही कोणताही व्यवहार करु नये व असा व्यवहार करण्यात आल्यास तो बेकायदेशिर ठरेल व तो आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची सर्वांनी नोंद घ्यावी.

**पनवेल.**
**दि. १६/०४/२०२५**

**सही/–**
**ॲड. श्री. प्रशांत अशोक भुजबळ**
**कार्यालय :** २, आशादिप अपार्टमेंट, वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहाजवळ, अनिल झेरॉक्सच्या बाजूला, पनवेल.
दूरध्वनी क्र. : २७४५६३०६

# आपले सरकार सेवा केंद्रासाठी इच्छुक नागरिकांनी अर्ज करावेत

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यातील सध्या रिक्त असलेल्या आपले सरकार सेवा केंद्रांची माहिति जिल्हाधिकारी कार्यालयाच्या https://raigad.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. रिक्त असलेल्या सर्व आपले सरकार सेवा केंद्रासाठी इच्छुक नागरिकांनी https://raigad.gov.in या संकेत स्थळावरून देण्यात आलेल्या ऑनलाईन व ऑफलाईन पद्धतीने अर्ज भरून आवश्यक असलेली सर्व कागदपत्रांसह आपला अर्ज दि.१५ मे रोजी सायं. ०६.१५ वा. पर्यंत जिल्हाधिकारी कार्यालय, रायगड–अलिबाग येथे जमा करावा, असे आवाहन जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी केले आहे.

प्रत्येक ग्रामपंचायत व नगरपंचायत क्षेत्रात किमान २ केंद्र स्थापन करण्यात येईल, मात्र ५००० पेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या (२०११ च्या जनगणनेनुसार) किमान ४ केंद्रे स्थापन करण्यात येईल. शहरी भागासाठी आपले सरकार केंद्रासाठी महानगरपालिका व नगरपरिषद १० हजार लोकसंख्येसाठी २ केंद्र स्थापन करण्यात येईल.

महाराष्ट्र राज्यात सध्या कार्यरत असलेली सर्व महा ई सेवा केंद्रे, सेतु सुविधा केंद्रे, नागरी सुविधा केंद्रे तसेच संग्राम केंद्रे यांना आपले सरकार सेवा केंद्र हे नाव देऊन सर्व कॉमन सर्व्हिस सेंटरचे एकसारखे ब्रँडींग करण्यात आले आहे.तरी नवीन आपले सरकार सेवा केंद्राचा अर्ज भरते वेळी तांत्रिक अडचणी असल्यास जिल्हा माहिती तंत्रज्ञान कक्ष, जिल्हाधिकारी कार्यालय, रायगड–अलिबाग येथे संपर्क साधावा.

आपले सरकार सेवा केंद्र अर्ज मागणी कालावधी ३० दिवस, दि.१६ एप्रिल ते दि.१५ मे २०२५ पर्यंत. प्राप्त अर्जांची छाननी कालावधी १५ दिवस असेल.

## महाड तालुक्यातील १३४ ग्रामपंचायती सरपंचपद आरक्षण २३ एप्रिलला सोडत

**महाड : प्रतिनिधी**

महाड तालुक्यातील संपुर्ण म्हणजेच १३४ ग्रामपंचायतीच्या सरपंच पदाचे आरक्षण सोडत २३ एप्रिल २०२५ रोजी सकाळी ११ वाजता पेणचे उपविभागीय अधिकारी प्रविण पवार यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय स्मारक महाड येथील बहुउद्देशीय सभागृहात आयोजित केली जाणार आहे.

रायगड जिल्हाधिकारी यांनी ७ एप्रिल २०२५ रोजी जिल्ह्यातील ग्रामपंचायत सरपंचपदाच्या आरक्षण सोडतीबाबत आदेश पारित केला असून त्याला अनुसरून सन २०२५ ते २०३० साठी तालुकानिहाय आरक्षण सोडतीचे आयोजन करण्याच्या सूचना संबंधितांना देण्यात आल्या आहेत. महाड तालुक्यातील १३४ ग्रामपंचायतींची सरपंचपदाची आरक्षण सोडत येत्या २३ एप्रिल २०२५ रोजी सकाळी ११ वाजता पेणचे उपविभागीय अधिकारी प्रविण पवार यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली केली जाणार आहे.

यामध्ये अनुसूचित जातीसाठी खुल्या ३ व महिला ३, अनुसूचित जमातीसाठी खुल्या ५, महिला ४, नागरिकांचा मागास प्रवर्गसाठी खुल्या १८, महिला १८ आणि सर्वसाधारण जागेसाठी खुल्या ४१, महिला ४२ अशा एकूण १३४ जागांसाठी आरक्षण सोडत जाहीर होणार आहे. तहसीलदार महेश शितोळे यांनी सूचना जारी केली

## रोहा अष्टमी नगर परिषद

ता. रोहा, जि. रायगड पिन कोड नं. ४०२१०९
फोन नं. कार्यालय–०२१९४/२३५५२० फॅक्स नं. ०२१९४/२३१०८७
email : rohanagarpalika@gmail.com

क्र.रोनप/आरोग्य/कोटेशन/०९८/२०२५–२०२६ दिनांक – १६–०४–२०२५

### जाहीर निविदा सूचना

रोहा अष्टमी नगर परिषदेद्वारे आरोग्य विभागाकरीता आवश्यक हत्यारे व अवजारे खरेदी/पुरवठा करणे कामी अनुभवी व इच्छुक ठेकेदारांकडून विहित नमुन्यात दरपत्रक / कोटेशन मागविण्यात येत आहे. विहीत नमुन्यातील सर्व अटी शर्तीसह निविदा पत्रे/फॉर्मची विक्री नगर परिषद कार्यालय, रोहा येथे कार्यालयीन वेळेत दिनांक १७/०४/२०२५ पासून २५/०४/२०२५ रोजीपर्यंत कार्यालयीन वेळेत दुपारी ३.०० वाजेपर्यंत कामकाजाचे दिवशी रक्कम रुपये खाली नमुद केलेप्रमाणे नगर परिषद कार्यालयात रोखीने भरणा करुन निविदा पत्रे/फॉर्म प्राप्त करुन घेता येतील. अधिक माहितीसाठी नगर परिषदेच्या आरोग्य विभागात संपर्क साधावा.

| क्र. | कामाचा तपशिल | इसारा रक्कम (रुपये) | कोरी निविदा फॉर्म फी (रुपये) | काम करणेची मुदत |
|---|---|---|---|---|
| १ | रोहा अष्टमी नगर परिषद आरोग्य विभागाकरीता आवश्यक हत्यारे व अवजारे खरेदी / पुरवठा करणे. | ५००० | ५०० | कामाचे आदेश दिलेपासून ३६५ दिवस |
| २ | रोहा अष्टमी नगर परिषद हद्दीमधील नगरपरिषदेने आणि पोलीस विभागामार्फत निश्चित केलेल्या ठिकाणी सम–विषम पार्किंग, नो–पार्किंग व शहरात इतरत्र अनधिकृत पार्किंग केलेल्या वाहनांवर कारवाई करणे व सशुल्क वाहन पार्किंग (पे & पार्क तत्वावर) चालविणे. | ५००० | ५०० | कामाचे आदेश दिलेपासून ३६५ दिवस |

**सही/–**
**(अजयकुमार एडके)**
**मुख्याधिकारी**
**रोहा अष्टमी नगर परिषद**

# माणगावात उपजिल्हा रुग्णालयास वैद्यकीय उपकरणांचे वाटप

**माणगाव : प्रतिनिधी**

डॉ.श्री.नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठान रेवदंडा ता.अलिबाग यांच्यातर्फे माणगाव उपजिल्हा रुग्णालयास बुधवार दि.१६ एप्रिल रोजी मान्यवरांच्या उपस्थितीत २५ लाख रुपये किमतीचे विविध वैद्यकीय उपकरणे यांचे वाटप गांधी मेमोरियल हॉल, मध्ये करण्यात आले. प्रतिष्ठानच्या या उपक्रमाचे रायगड जिल्ह्यात सर्वत्र विशेष कौतुक होत आहे.

माणगाव रुग्णालयात महामार्गावर घडणाऱ्या अपघातातील जखमींना औषोधोपचारासाठी दाखल करण्यात येते. तसेच दक्षिण रायगडातील माणगाव , तळा, म्हसळा, श्रीवर्धन, महाड, पोलादपूर आदी तालुक्यांतून गरीब रुग्ण औषोधोपचारासाठी येत असतात. याठिकाणी गरिबांना चांगली सेवा मिळावी हा उद्देश नजरेसमोर ठेऊन सामाजिक बांधिलकीच्या भावनेतून समाजात काम करणाऱ्या नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानतर्फे या रुग्णालयास वैद्यकीय उपकरण यांचे वाटप करण्यात आले.

सदरचे उपकरणे रुग्णालयाचे प्रभारी वैद्यकीय अधीक्षक डॉ.महेश मेथा यांच्याकडे तालुक्याचे तहसीलदार दशरथ काळे,माणगाव नगरपंचायतीचे मुख्याधिकारी संतोष माळी, माणगाव उपविभागीय कार्यालयाचे कर्मचारी.पाचाडकर,उपजिल्हा रुग्णालयाच्या वैद्यकीय अधिकारी डॉ.मृणालीनी वाढवळ, डॉ.सानप,लता राठोड,परिचारिका शिवकांती गवळी, शर्मिला गोडबोले, संजय देसाई यांच्या उपस्थितीत श्री सदस्य सुरेश वाढवळ, संदीप खरंगटे, नितीन बामगुडे, नितीन वाढवळ, अपर्णा वाढवळ यांनी केले.

रुग्णालयाचे प्रभारी वैद्यकीय अधीक्षक डॉ.महेश मेथा यांनी प्रतिष्ठानने रुग्णालयास वस्तुरूपी मोठ्या प्रमाणात सहकार्य केले आहे. आम्ही जी यादी दिली होती त्यापेक्षा अधिक साहित्य आमच्या रुग्णालयास देण्यात आले आहे. या रुग्णालयात श्री सदस्यांना जे काही सहकार्य लागेल ते देण्यासाठी आम्ही सहकार्य करू असे सांगितले.

# मुरुड शहरात पारा ३६ अंश सेल्सिअसवर

**मुरुड :** होळी नंतर उन्हाचा तडाखा वाढला असून काही दिवसांपासून सुर्य चांगलाच तळपत आहे. शहरात ३६ अंश सेल्सिअसवर तापमानाची नोंद झाली आहे.सकाळी आठ पासुन ऊन चटकायला सुरुवात होते दुपारी १२ ते ३ च्या दरम्यान उन्हाची तीव्रता इतकी असते की लोक घराबाहेर पडणे ही टाळतात. तापमानात सारखी सारखी वाढ होत असल्याने यांचा परिणाम जनजीवनावर ठळकपणे जाणवला सुरुवात झाली आहे.



उन्हाचे चटके शरीराला जाणवु लागले. आहेत घरात बसणे ही अवघड होऊ लागल आहे शरीराला गारवा मिळवण्यासाठी नागरिकांची पावले डेअरी, रसवंती गृह वळली असुन ताक ,लस्सी, कोल्ड्रिंक्स, आईस्क्रीम, बर्फ गोळा, थंड पाणी, कुल्फी अशा वेगवेगळ्या थंड पेये घेण्यासाठी गर्दी केलेली दिसुन येत असल्याने डेअरी व कोल्ड्रिंक्स या विक्रेते यांचा धंदा तेजीत आहे.

# कडक उन्हातही संकष्ट चतुर्थीनिमित्त पाली व महड येथे भाविकांची गर्दी

**पाली खोपोली : प्रतिनिधी**

तीव्र उन्हाचा पारा असला तरीही संकष्ट चतुर्थी निमित्त पालीला बाल्लळेश्वर व महडला वरद विनायकाच्या दर्शनासाठी भाविकांची मोठी गर्दी झाली होती.



जिल्ह्यासह संपूर्ण महाराष्ट्रभरातून भाविक दाखल झाले होते. बल्लाळेश्वराच्या दर्शनासाठी काही भाविक पायी आले, तर काही भाविकांनी पायी दिंडी आणली होती. संकष्ट चतुर्थीनिमित्त मंदिराला विद्युत रोषणाई व आकर्षक फुलांची सजावट केली होती. मंदिरात व मंदिराबाहेर सुबक रांगोळ्या देखील काढल्या आहेत. मंदिर परिसरातील दुकाने व हॉटेल ग्राहकांनी गजबजले होते. भाविकांच्या सोयीसाठी बल्लाळेश्वर देवस्थान ट्रस्टच्या वतीने चोख व्यवस्था करण्यात आली आहे. अष्टविनायक क्षेत्र महड येथील वरद विनायकाच्या दर्शनासाठी भाविकांनी केलेल्या गर्दीने महामार्गावर मोठ्या प्रमाणात वाहने दिसली . दुपारी उन्हाचा तडाखा तीव्र असल्याने दुपारी गर्दी काही प्रमाणात मंदावली मात्र उन कमी झाल्यावर भाविकांनी गर्दी झाली होती. दर्शनासाठी आलेल्या भाविकांची कोणतीही गैरसोय होऊ नये म्हणून श्री.क्षेत्र महड देवस्थान कमिटी व स्थानिक नागरिकांनी आपआपल्या स्तरावर योग्य सोयी सुविधा उपलब्ध केल्या होत्या.

मंदिर व्यवस्थापक राजेंद्र बडगुजर यांनी दिलेल्या माहितीनुसार पहाटेपासून. दुपार पर्यंत सात ते आठ हजारच्यावर भाविकांनी गणरायाचे दर्शन घेतले.

## Janardan Bhagat Shikshan Prasarak Sanstha, Panvel

**Plot No.8, Sector-14, Janardan Atmaram Bhagat Marg, CIDCO Colony, New Panvel (E), Tal.: Panvel, Dist.: Raigad, Pin- 410206**

**Applications are invited for Administrative Assistants**

| Particulars of the Post | No. of Posts |
|---|---|
| **Administrative Assistants** | **02** |
| Educational Qualification | Post Graduate (Preferably MBA) (Any Stream) |

**Required skills**

| Hard Skills | Soft Skills |
|---|---|
| • Data Entry and Management<br>• Advanced Proficiency in Microsoft Office suite<br>• Basic Accounting and Bookkeeping<br>• Typing Speed and Accuracy (English and Marathi)<br>• Database Administration<br>• Document Management and Filing Systems<br>• Information Technology (IT) Skills<br>• Stake Holders Relationship Management<br>• Business Correspondence<br>• Time Management and Scheduling | • Effective Communication and Active Listening<br>• Time Management and Prioritization<br>• Adaptability and Flexibility<br>• Problem-Solving and Critical Thinking<br>• Attention to Detail and Accuracy<br>• Customer Service and Client Relations<br>• Teamwork and Collaboration<br>• Organizational and Filing Skills<br>• Confidentiality and Discretion<br>• Stress Management and Resilience |

Applications with full details should reach with the attested photocopy of certificates to **The Chairman, Janardan Bhagat Shikshan Prasarak Sanstha, Plot No.8, Sector-14, Janardan Atmaram Bhagat Marg, CIDCO Colony, New Panvel (E), Tal.: Panvel, Dist.: Raigad, Pin-410206.** Candidates may submit application by email to **jbsp123_sanstha@yahoo.in** on or before **28/04/2025.** In case of any query contact **Mrs. Suvarna Choudhary- 9222161835**

**Shri Ramsheth Thakur ( Ex.M.P)**
**Chairman, Janardan Bhagat Shikshan Prasarak Sanstha**

राम प्रहर
वस्तुनिष्ठ बातम्या आणि आकर्षक जाहिरातींसाठी

## जाहीर नोटीस

तमाम लोकास या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात वर्णन केलेली सामाईक मिळकत ही त्यांचे विद्यमान मालक **पराग कृष्णा गावंड** यांचेकडून द्वैपायन भट्टाचार्जी कायमस्वरुपी विकत घेण्याबाबतचा व्यवहार आमचे अशिल यांनी ठरविला आहे व या व्यवहाराची जाहीर नोटीस वर्तमानपत्रात देण्याबाबत विद्यमान मालक **पराग कृष्णा गावंड** यांनी आमच्या अशिलांना संमती दर्शवली आहे व आमच्या अशिलांच्या सांगण्यावरुन ही वर्तमानपत्र जाहीर नोटीस देत आहे.

मिळकतीचे वर्णन : मौजे : पिरकोन (५५३३३९)
(PU-ID : 12731463128), तालुका–उरण, जिल्हा–रायगड

| गट क्रमांक | भूधारणा पद्धत | क्षेत्र (हे.आर.चौ.मी.) | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| २१४/२ खाते क्रमांक : १७०६ | १ | ०.०६.१० पो.ख. ०.००.२० **एकुण ०.०६.३०** | ०.६९ |

**एकुण क्षेत्र ०.०६.३० गुंठे**

वर नमुद केलेल्या जमिनीच्या मिळकतीमध्ये कोणत्याही व्यक्तीचा अथवा व्यक्तींच्या कोणत्याही संस्थेचा गहाण, दान, बक्षिस, खरेदीखत, साठेकरार, मिळकत विकसित करणेबाबतचा करार, कुळहक्क, वारसाहक्क, वहिवाटीचा हक्क, ताबा हक्क, भाडेपट्टा, पोटगी, मृत्यूपत्र, बोजा अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध असल्यास त्याच्या लेखी हरकती, त्यांच्या हरकतीतील नमूद केलेल्या हक्काबाबत प्रथमदर्शनी योग्य त्या पुरेशा कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिध्द झालेपासून १४ दिवसांचे आत खाली दिलेल्या आमच्या पत्त्यावर प्रत्यक्ष येऊन अथवा रजिस्टर पोस्टाने कागदोपत्री पुराव्यासह आपल्या लेखी हरकती व आक्षेप दाखल करावेत अन्यथा मुदतीत हरकती न असल्यास सदर मिळकतीशी इतर कोणाचेही कोणतेही हक्क हितसंबंध नाहीत वा असल्यास ते त्यांनी सोडून दिलेले आहेत. व सदर मिळकत निर्वेध आहेत असे गृहीत धरुन आमचे आशिल सदर मिळकतीचे खरेदीखत व्यवहार पूर्ण करतील मग मागाहून मुदतीनंतर उपस्थित करण्यात आलेल्या कोणत्याही हरकती व आक्षेप आमच्या आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक : १७/०४/२०२५

**सही/–**
**ॲड. निलेश बा. झंजाड**
बी–१०४ सफायर सी.एच.एस. भूखंड क्रमांक – ३३/३४, सेक्टर २२, कामोठे, तालुका–पनवेल, जिल्हा–रायगड –४१०२०६
मो. क्र. ९९२०४७५८०१

## जाहीर नोटीस

तमाम लोकास या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात वर्णन केलेली सामाईक मिळकत ही त्यांचे विद्यमान मालक **अस्मिता संजय फडतरे** यांचेकडून कविता कौशल सिन्हा कायमस्वरुपी विकत घेण्याबाबतचा व्यवहार आमचे अशिल यांनी ठरविला आहे व या व्यवहाराची जाहीर नोटीस वर्तमानपत्रात देण्याबाबत विद्यमान मालक **अस्मिता संजय फडतरे** यांनी आमच्या अशिलांना संमती दर्शवली आहे व आमच्या अशिलांच्या सांगण्यावरुन ही वर्तमानपत्र जाहीर नोटीस देत आहे.

मिळकतीचे वर्णन : मौजे : विंधणे (५५३३२४)
(PU-ID : 32957341536), तालुका–उरण, जिल्हा–रायगड

| गट क्रमांक | भूधारणा पद्धत | क्षेत्र (हे.आर.चौ.मी.) | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| २९४/१ खाते क्रमांक : १०२१२ | १ | ०.०३.८० पो.ख. ०.००.२० **एकुण ०.०४.००** | ०.२८ |

**एकुण क्षेत्र ०.०४.०० गुंठे**

वर नमुद केलेल्या जमिनीच्या मिळकतीमध्ये कोणत्याही व्यक्तीचा अथवा व्यक्तींच्या कोणत्याही संस्थेचा गहाण, दान, बक्षिस, खरेदीखत, साठेकरार, मिळकत विकसित करणेबाबतचा करार, कुळहक्क, वारसाहक्क, वहिवाटीचा हक्क, ताबा हक्क, भाडेपट्टा, पोटगी, मृत्यूपत्र, बोजा अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध असल्यास त्याच्या लेखी हरकती, त्यांच्या हरकतीतील नमूद केलेल्या हक्काबाबत प्रथमदर्शनी योग्य त्या पुरेशा कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिध्द झालेपासून १४ दिवसांचे आत खाली दिलेल्या आमच्या पत्त्यावर प्रत्यक्ष येऊन अथवा रजिस्टर पोस्टाने कागदोपत्री पुराव्यासह आपल्या लेखी हरकती व आक्षेप दाखल करावेत अन्यथा मुदतीत हरकती न असल्यास सदर मिळकतीशी इतर कोणाचेही कोणतेही हक्क हितसंबंध नाहीत वा असल्यास ते त्यांनी सोडून दिलेले आहेत. व सदर मिळकत निर्वेध आहेत असे गृहीत धरुन आमचे आशिल सदर मिळकतीचे खरेदीखत व्यवहार पूर्ण करतील मग मागाहून मुदतीनंतर उपस्थित करण्यात आलेल्या कोणत्याही हरकती व आक्षेप आमच्या आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक : १७/०४/२०२५

**सही/–**
**ॲड. निलेश बा. झंजाड**
बी–१०४ सफायर सी.एच.एस. भूखंड क्रमांक – ३३/३४, सेक्टर २२, कामोठे, तालुका–पनवेल, जिल्हा–रायगड –४१०२०६
मो. क्र. ९९२०४७५८०१

## निवडक

### उभी केलेली दुचाकीची चोरी

**पनवेल :** रेल्वे स्टेशन बाहेरील पार्किंगसमोर एनएमएमटी बस स्टॉपच्या समोरील रस्त्यावर उभी करून ठेवलेली दुचाकी अज्ञात चोरट्यांनी चोरून नेल्याची घटना घडली आहे. योगिता पवार यांनी त्यांची ३२ हजार रुपये किमतीची हिरव्या रंगाची टीव्हीएस स्कूटी गाडी (एमएच-४६-बीएन-०३२२) ही वरील ठिकाणी उभी करून ठेवली असता अज्ञात चोरट्याने चोरुन नेल्याने याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

### प्रवासादरम्यान दागिने चोरले

**पनवेल :** एसटी प्रवासादरम्यान लाखो रुपये किंमतीचे सोन्याचे दागिने अज्ञात चोरट्यांनी लंपास केल्याची घटना घडल्याने याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. शुभांगी पाटील (वय ४३) या डोंबिवली ते पेण असा बसने प्रवास करीत असताना त्यांच्या प्रवासादरम्यान अज्ञात चोरट्याने त्यांच्या बॅगेमधून जवळपास दोन लाख ३० हजार रुपये किंमतीचे सोन्याचे दागिने लंपास केल्याने याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

### वाशी येथे डॉ. आंबेडकर जयंती

**नवी मुंबई :** भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती



वाशी येथील झुणझुणवाला महाविद्यालयात साजरी करण्यात आली. डॉ. बाबासाहेबांनी लिहलेल्या प्रॉब्लेम ऑफ रुपीज या ग्रंथाच्या आधारे भारतीय रिजर्व बँकेची उभारणी करण्यात आली. हीच बँक भारताच्या पूर्ण आर्थिक परिस्थितीवर अंकुश ठेवते असे प्रा. उपप्राचार्य समाधान मोरे यांनी सांगितले. या वेळी विद्यार्थी, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी जयंतीस आवर्जून उपस्थित होते.

### प्रबुद्ध संस्थेतर्फे भीमजयंती



**पनवेल :** भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची १३४ वी जयंती प्रबुद्ध सामाजिक संस्थेच्या माध्यमातून महापुरुषांच्या विचारांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. शाळेय विद्यार्थ्यांसाठी चित्रकला स्पर्धा, निबंध स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन केले होते. या वेळी भंत्ते संघपाल यांच्या उपस्थितीत बुद्धवंदना घेण्यात आली. प्रमुख पाहुणे पनवेल शहर पोलीस ठाण्याचे वपोनि नितीन ठाकरे यांच्यासह इतर मान्यवर तसेच करंजाडे मधील सर्व धम्मबांधव धम्मभगिनी युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# उरण टपाल कार्यालयासाठी जागेची मागणी

## इच्छुकांनी २८ एप्रिलपर्यंत अर्ज सादर करण्याचे आवाहन

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

भारत सरकारच्या टपाल विभागातर्फे उरण येथे नवीन टपाल कार्यालय स्थापन करण्यासाठी उरण परिसरात भाडे तत्वावर जागेची मागणी करण्यात आली आहे. यासाठी सुमारे एक हजार २६४ चौरस फूट चटई क्षेत्रफळ/ बांधकाम क्षेत्रफळ असलेली जागा आवश्यक असून, इच्छुकांनी २८ एप्रिलपर्यंत अर्ज सादर करावे. असे आवाहन वाशी नवी मुंबई विभागाचे वरिष्ठ अधीक्षक डाकघर यांनी केले आहे.

भारताचे राष्ट्रपती यांच्या वतीने उरण परिसरात टपाल कार्यालय सुरु करण्यासाठी आवश्यक असलेली जागा भाडेतत्वावर देण्यासाठी इच्छुक व्यक्ती, संस्था किंवा बिल्डर यांनी अपेक्षित भाडे, उपलब्ध जागेचे क्षेत्रफळ, अटी व शर्ती (काही असल्यास) व जागेच्या तपशीलासह आपले अर्ज प्रवर अधीक्षक डाकघर, नवी मुंबई विभाग, वाशी - ४००७०३ या कार्यालयाकडे दि. २८ एप्रिल २०२५ असून, दुपारी ३.३० वाजेपर्यंत सिलबंद लखोट्यात पाठवावेत.

जागा निवडताना तिची उपयुक्तता व दैनंदिन पोस्ट ऑफिसच्या कामकाजासाठी सुविधा उपलब्ध असणे आवश्यक आहे. सदर जागा ही इमारत किंवा इमारतीचा भाग असावा तसेच सदर जागेचे चटई क्षेत्र/ बांधकाम क्षेत्र हे एक हजार २६४ चौरस फूट(अंदाजे) उरण टपाल कार्यालयासाठी असावे. थोडासा क्षेत्रफळात फरक असला तरी तो ग्राह्य धरला जाईल.

अर्जासोबत इमारतीचा बांधकाम आराखडा, जिल्हाधिकारी कार्यालयाची परवानगी, पंचायत परवानगी, ७/१२ उताऱ्याची प्रत, वीज व पाण्याचे स्वतंत्र मीटर या संदर्भातील अर्जदाराच्या नावे असलेली आवश्यक कागदपत्रे जोडणे बंधनकारक आहे. अर्ज स्वीकारण्याची अंतिम तारीख २८ एप्रिल २०२५ असून, दुपारी ३.३० वाजेपर्यंत अर्ज सादर करता येतील. सर्व अर्जांची छाननी दि. ६ मे २०२५ रोजी दुपारी ४.३० वाजता प्रवर अधीक्षक डाकघर, वाशी कार्यालयात अर्जदारांच्या उपस्थितीत केली जाणार आहे. अर्ज स्वीकारणे किंवा नाकारण्याचा संपूर्ण अधिकार टपाल विभागाकडे असून, कोणतेही कारण न देता अर्ज फेटाळण्याचा अधिकार विभागाने राखून ठेवलेला आहे.

अधिक माहितीसाठी प्रवर अधीक्षक डाकघर, नवी मुंबई विभाग, वाशी - ४००७०३ (०२२-२७६६६६६५/२७६६३११३) यांच्याशी सोमवार ते शुक्रवार सकाळी १० ते संध्याकाळी ५ या वेळेत संपर्क साधावा, असे आवाहन वाशी नवी मुंबई विभागाचे वरिष्ठ अधीक्षक डाकघर मुहम्मद साहिद यांनी एका प्रसिध्दी पत्रकाद्वारे केले आहे.

# रसायनी कॉर्नर ते रसायनी रेल्वे स्टेशन रस्ता डागडुजीची मागणी

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

रसायनी कॉर्नर ते रसायनी रेल्वे स्थानक रस्त्याची दुरावस्था झाल्याने प्रवासी व नागरिकांना विविध समस्यांना सामोरे जावे लागत आहे. हा रस्त्याची लवकरात लवकर डागडुजी करण्यात यावी, अशी मागणी बजरंग दलाच्या वतीने करण्यात आली आहे.

रहदारीच्या रस्त्याची दुरवस्था झाल्याने वाहनांचे नुकसान होत असून अपघातांची संख्याही वाढली आहे. यासाठी सामाजिक कार्यकर्ते सुभाष कोकणे यांनी ११ फेब्रुवारी २०२५ रोजी सार्वजनिक बांधकाम विभाग व इतरत्र अर्ज केला होता, परंतु दोन महिने होवूनही कोणतीही कार्यवाही नसून हा रस्ता जैसे थेच आहे. पावसाळ्या आधी जर हे काम झाले नाही तर रस्त्याची आणखीनच दुरावस्था होऊन अपघाताचे प्रमाण वाढू शकते.

प्रशासनाने रस्ता दुरुस्ती संदर्भात योग्य ती कार्यवाही २१ एप्रिल २०२५पर्यंत न केल्यास तुराडे, कष्टकरी नगर, आणि जुनी पोसरी येथील नागरिक आणि बजरंग दल २२ एप्रिल २०२५ रोजी तीव्र आंदोलन करतील, असा इशारा आंतरराष्ट्रीय बजरंग दलाचे सुभाष कोकणे यांनी दिला आहे.



**पनवेल : श्री शांतादेवी मंदीर, गव्हाण येथे श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ पुरस्कृत माऊली हरिपाठ मंडळ, गव्हाण-कोपर यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या हरिनाम सप्ताहाला आमदार प्रशांत ठाकूर व आमदार महेश बालदी यांनी उपस्थित राहून श्री. विठुरायाचे दर्शन घेतले. तसेच सर्वांना शुभेच्छा दिल्या.**

# अग्निशमन सेवा दिनानिमित्त शहीद अग्निशमन जवानांना आदरांजली

**नवी मुंबई : बातमीदार**

अग्निविमचनाचे काम करीत असताना आपल्या प्राणांचे बलिदान करणाऱ्या शहीदांचा सन्मान राखताना त्यांचे स्मरण करून अशा घटना पुन्हा घडू नयेत यासाठीची खबरदारी घेण्याचा संदेश प्रत्यक्षात अंगिकारण्यासाठी आजचा अग्निशमन सेवा दिन महत्वाचा असल्याचे सांगत नमुंमपा आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी शहीद अग्निशमन जवानांच्या स्मृतीस्तंभास पुष्पचक्र अर्पण करीत भावपूर्ण आदरांजली दिली.



नवी मुंबई महानगरपालिका अग्निशमन दलाच्या वतीने वाशी अग्निशमन केंद्रात अग्निशमन दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमाप्रसंगी आयुक्तांनी उपस्थित अग्निशमन जवानांशी संवाद साधला. या वेळी उपस्थित मुख्य अग्निशमन अधिकारी तथा शहर अभियंता शिरीष आरदवाड, उपमुख्य अग्निशमन अधिकारी पुरूषोत्तम जाधव, केंद्र अधिकारी व्ही.डी.कोळी, पी.एम.गोळे, आर. जी.चौधरी, आर.आर.कोकाटे, एस.आर.चन्ने यांच्या हस्ते पुष्पचक्र अर्पण करून श्रध्दांजली अर्पण करण्यात आली.

नवी मुंबई महानगरपालिकेच्या ५ अग्निशमन केंद्राद्वारे शहर सुरक्षिततेची जबाबदारी आपले अग्निशमन दल पार पाडत असून आपत्तीनंतर आपत्ती निवारणाचे कार्य तत्परतेने करण्यासोबतच आपत्ती उद्भवूच नये याकरिता नागरिकांमध्ये जागरूकता निर्माण करणारे उपक्रम प्रात्यक्षिकासह राबविण्यावर भर द्यावा असे आयुक्तांनी सांगितले. त्यासाठी मोठ्या सोसायट्या, संस्था, शाळा, महाविद्यालये, कार्यालये, उद्योगसमुह, मॉल्स अशा वेगवेगळ्या गर्दीच्या ठिकाणी प्रभावीपणे जनजागृतीपर उपक्रम राबवावेत असे निर्देश आयुक्तांनी दिले.

१४ एप्रिल १९४४ रोजी मुंबई पोर्ट ट्रस्टमध्ये एस एस फोर्ट स्टिकीन या जहाजाला लागलेल्या आगीत मुंबई अग्निशमन दलातील ६६ जवानांनी स्वतःच्या प्राणांची आहुती देऊन अग्निविमोचनाचे कार्य केले. या शहीद जवानांना तसेच त्यानंतरही अग्नीविमोचनाचे कार्य करताना आपल्या प्राणांचे बलिदान दिलेल्या शहीद जवानांना भावपूर्ण अभिवादन करीत १४ एप्रिल हा दिवस 'अग्निशमन सेवा दिन' म्हणून देशभरात पालन करण्यात येतो.

# वीर वाजेकर महाविद्यालयात डॉ. आंबेडकरांना अभिवादन



**उरण : वार्ताहर**

वीर वाजेकर कला,विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची १३४ वी जयंती सोमवारी (दि. १४) साजरी करण्यात आली.

जयंतीनिमित्त डॉ.बाबासाहेब आंबेडकर व त्यांच्या स्वप्नातील भारत याविषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते.प्रा.डॉ.एम.सी.सोनवले यांनी आपल्या व्याख्यानातून बाबासाहेबांचे स्वंतत्र भारत कसा असेल यावर विवेचन केले. महाविद्यालयाचे प्रभारी, प्राचार्य डॉ.आमोद ठक्कर यांनी आपल्या अध्यक्षीय मनोगतातून व्यक्त केले की डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी सांगितलेला 'शिका,संगठित व्हा व संघर्ष करा' हा मूलमंत्र घेऊन आजच्या सुशिक्षित तरुणांनी वाटचाल केल्यास येणारी आव्हाने सक्षमपणे पेलू शकतील.तसेच राष्ट्र उभारणीत महत्त्वाचे योगदान देऊ शकतील.

प्रा.राम गोसावी यांनी प्रास्ताविक केले. कार्यक्रमास प्रा.गजानन चव्हाण(उपप्राचार्य), डॉ. झेलम झेंडे, डॉ.राजकुमार कांबळे, प्रा.भूषण ठाकूर, प्रा.अर्जुन पाटील तसेच राष्ट्रीय सेवा योजनेचे तसेच राष्ट्रीय छात्र सेनेचे विद्यार्थी उपस्थित होते.

**पनवेल : परिणीता सोशल फाउंडेशनच्या पुरस्कार सोहळा नुकताच झाला. या वेळी आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात प्रसिद्ध अभिनेत्री जुई गडकरी हिने आपल्या पणजोबांचा म्हणजेच थोर नाटककार कै. राम गणेश गडकरी यांचा फोटो बघताच मिळालेला पुरस्कार घेऊन तसबिरी सोबत फोटो काढला.**



### क्लिक...क्लिक...!



(छाया : अमेय नाझरे)

**श्रीवर्धन : तालुक्यातील आदगाव येथील नयनरम्य समुद्र किनारा पर्यटकांना साद घालत आहे.**

# तळोजा ग्रामीण महिलांची आत्मनिर्भरतेकडे वाटचाल

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

ग्रामीण भागातील महिलांकडून चालवल्या जाणाऱ्या दुग्धव्यवसायांपासून ते शेतीसाठी उजाड जमीन सुपीक करण्यात आणि गावकऱ्यांना उद्योजक बनवण्यात दीपक फर्टिलायझर्स अँड पेट्रोकेमिकल्स कॉर्पोरेशन लिमिटेडने आपल्या 'इशान्य फाउंडेशन' या सीएसआर विभागाच्या माध्यमातून सन्मान आणि स्वावलंबनाचे महत्वाचे पाऊल उचलले. त्या अनुषंगाने तळोजा परिसरातील गावांमधील ग्रामस्थांच्या जीवनात आर्थिकदृष्ट्या सबलीकरणासाठी रोजगाराचे सकारात्मक प्रोत्साहन मिळाले आहे.



चिंचवली गावात राहणाऱ्या मनीषा गोटीराम रिकामे यांचे संपूर्ण कुटुंब पतीच्या शेतीवर अवलंबून होते, पण दीपक फर्टिलायझर्सच्या दुग्धव्यवसायविकास प्रकल्पात सहभागी झाल्यावर परिस्थितीत आमूलाग्र बदल झाला. गायींची निगा, पोषण आणि प्रशिक्षणाच्या मदतीने त्यांनी आपल्या छोट्याशा गोठ्याला स्थिर उत्पन्नाचे साधन बनवले.



खैरवाडी गावातील अल्पभूधारक शेतकरी कालीबाई आणि श्रावण भगत यांनी जोपर्यंत त्यांनी दीपक फर्टिलायझर्स राबवत असलेल्या वाडी विकास उपक्रमात भाग घेतला नव्हता तो पर्यंत जवळजवळ शेती सोडून देण्याचा विचार केला व्होता. त्यांना शेतातून पुरेशे उत्पन्न मिळत नव्हते. तांत्रिक मार्गदर्शन आणि सुधारित पद्धतींमुळे, त्यांच्या शेतातून होणारे उत्पन्न वाढताना दिसत आहे. नितलसच्या वसुधा वसंत पवार यांच्यासाठी आर्थिक स्वातंत्र्य ही एक दूरची कल्पना होती, पण दीपक फर्टिलायझर्सच्या मदतीने, त्या एक लहान नाष्टा व चहा सेंटर उभारू शकल्या.

सीएसआर उपक्रम राबवत असताना दीपक फर्टिलायझर्स लोकसहभाग आणि शाश्वत विकासावर भर देत आहे. कंपनीच्या उपक्रमांबद्दल बोलताना कॉर्पोरेट गव्हर्नन्स अध्यक्ष नरेश पिनिसेट्टी यांनी म्हंटले की, आमचा समुदायाशी संबंध फक्त आमच्या प्लांटच्या सीमांपुरता मर्यादित नाही. आम्ही या गावातील लोकांसोबत चालण्यावर विश्वास ठेवतो, त्यांना चांगले उपजीविका साधन, आरोग्य आणि चांगले प्रशिक्षण देण्यासाठी प्राधान्य देतो. आमच्या उपक्रमाचे खरे यश हे आहे की आम्ही आमच्या सभोवतालच्या समुदायाच्या जीवनात सकारात्मक बदल घडवू शकतो.

# सहा हजारांपेक्षा अधिक वह्यांचे दान

**नवी मुंबई : बातमीदार**

ठाण्याचे माजी खासदार आणि भाजप नेतृत्व डॉ. संजीव नाईक यांचा वाढदिवस ठाणे, नवी मुंबई, मीरा-भाईंदर ठाणे जिल्ह्यासह महाराष्ट्रातील विविध भागात विधायक उपक्रमांनी साजरा करण्यात आला.

वाढदिवसानिमित्त पुष्पगुच्छ, हार तुरे,भेटवस्तू न आणता आदिवासी आणि गरजू विद्यार्थ्यांसाठी वह्या दान करण्याचे आवाहन संजीव नाईक यांच्या वतीने करण्यात आले होते. त्याला उत्स्फूर्त प्रतिसाद देत सुमारे सहा हजारपेक्षा अधिक वह्या कार्यकर्ते, हितचिंतक आणि मित्र मंडळी यांच्या वतीने दान करण्यात आलेल्या आहेत. शुभेच्छारूपी पुष्पगुच्छांचा सुगंध काही काळ टिकतो, पण वह्यांच्या रूपातील ही भेट हजारो विद्यार्थ्यांचा शैक्षणिक आनंद चिरकाळ टिकवणारा ठरणार आहे.

डॉ. नाईक यांच्या वाढदिवसानिमित्त विविध ठिकाणी रक्तदान शिबिर, आरोग्य तपासणी, शैक्षणिक साहित्य वाटप, ज्येष्ठांचा सन्मान, गुणवंतांचा सत्कार, स्वच्छता मोहिमा असे अनेक सामोजोपययोगी कार्यक्रम राबविण्यात आले, त्याचा हजारो नागरिकांनी लाभ घेतला. डॉक्टर संजीव नाईक याना प्रत्यक्ष भेटून भाजपचे अनेक पदाधिकारी, लोकप्रतिनिधी, कार्यकर्ते, विविध क्षेत्रातील मान्यवर, समाजसेवी संस्थ्यांचे प्रतिनिधी यांनी त्यांचे अभिष्टचिंतन केले. वाढदिवसानिमित्त जनतेच्या भर भरून मिळालेल्या शुभेच्छा, सदिच्छा आणि प्रेम यामुळे जनसेवेसाठी काम करण्यासाठी अधिक ऊर्जा मिळाल्याची प्रतिक्रिया डॉक्टर नाईक यांनी या वेळी व्यक्त केली आहे.



# पनवेलमध्ये रंगले खुले कवी संमेलन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेलमधील के.गो. लिमये सार्वजनिक वाचनालय आणि कोकण मराठी साहित्य परिषद-शाखा (कोमसाप) पनवेल यांच्या संयुक्त विद्यमाने खुले कवी संमेलन आयोजित करण्यात आले होते. या वेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष व ज्येष्ठ कवी विजय जोशी यांनी, गझलेच्या प्रेमात पडा, पण व्यसनात अडकू नका. तुम्ही कवितेवर प्रेम केले तर ती तुमच्या प्रेमात पडेल, असे उद्गार काढले.



सादरीकरणाविषयी सांगताना ते म्हणाले, शब्दासोबत सुरांची साथ नसेल तर कविता गाऊन सादर करण्याचा अट्टाहास नसावा. गाण्याच्या चालीवर कविता सादर केल्याने कवितेतील शब्दांकडे रसिकांचे दुर्लक्ष होते. कवितेचे सादरीकरण प्रभावीपणे झाले पाहिजे.

प्रमुख पाहुणे सुभाष कटकधोंड यांनी आपल्या काव्य लेखनाचा प्रवास कथन करून काव्य लेखन कार्यशाळा आयोजित करण्याची सूचना केली. त्यासाठी त्यांनी स्वतः मार्गदर्शन करू असे सांगितले. पाहुण्यांचा परिचय कोमसाप पनवेल शाखेचे अध्यक्ष रोहिदास पोटे यांनी करून दिला. तर प्रास्ताविक वाचनालयाच्या अध्यक्षा सुनिता जोशी यांनी केले. या कवी संमेलनात सुमारे तीस कवींनी आपल्या दर्जेदार कविता सादर केल्या.

सूत्रसंचालन कोमसाप पनवेल शाखेचे सचिव सुभाष कुडके यांनी गझल चारोळ्यांचा यथोचित प्रभावी वापर करून सहजतेने केले. वाचनालयाचे कार्यकारणी सदस्य काशिनाथ जाधव यांनी आभार मानले. या कार्यक्रमासाठी दोन्ही संस्थांचे पदाधिकारी तसेच अनेक प्रतिष्ठित नागरिक उपस्थित होते. कार्यक्रमासाठी के.गो. लिमये वाचनालयाच्या ग्रंथपाल निकिता शिंदे, लिपिक हर्षिता तोडकर व सेवक संजय दिवटे यांनी परिश्रम घेतले.

# अवकाळी पावसाने पेणमध्ये ४०० घरांचे नुकसान

## ◆ ५५ गावांना फटका , नैसर्गिक आपत्तीचे पंचनामे सादर

**पेण : प्रतिनिधी**

तालुक्यात ४ एप्रिल रोजी सायंकाळी अचानक आलेल्या वादळी वारे आणि पावसाच्या नैसर्गिक आपत्तीमुळे तालुक्यातील सर्वच भागात मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. आत्तापर्यंत तालुक्यातील एकूण ५५ गावांमधील चारशेहून अधिक घरांचे नुकसान झाले असून अनेक ग्रामपंचायत, जिल्हा परिषदेच्या शाळा, अंगणवाड्धा, सभागृह यांचे देखील मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याची माहिती मिळाली आहे .





प्रशासनाकडून नुकसानीचे तातडीने पंचनामे करण्याचे आदेश तलाठी, ग्रामसेवक, मंडळ अधिकारी, कृषी खात्याचे कर्मचारी यांना देण्यात आले होते. आत्तापर्यंत तालुक्यातील पेण, वडखळ, वाशी, हमरापूर, कामार्ली, कासु या मंडळांमध्ये या पंचनाम्यांचे काम करण्यात आले असून तालुक्यातील ५५ गावांमध्ये संबंधित ग्रामसेवक, तलाठी, सर्कल, कृषी विभागाचे कर्मचारी यांनी नागरिकांच्या झालेल्या नुकसानीचे तातडीने पंचनामे केले आहेत. यामध्ये कच्च्या आणि पक्या एकूण ४२९ घरांचे अंशतः आणि पूर्णतः नुकसान झाले आहे. हमरापूर मंडळ विभागात एका गोठ्याचे देखील नुकसान झाले आहे.

पेण मंडळ विभागातील अंगणवाडी, जिल्हा परिषद शाळा, हॉटेल, चिल्ड्रन्स फाऊंडेशन खासगी शाळा, बेलवडे येथील गोशाळा, रामराज समाजमंदिर, फॉर्म हाउस यांचे अंशतः नुकसान झाले आहे. तर कामार्ली मंडळ विभागातील जावळी अंगणवाडी, जावळी जिल्हा परिषद शाळा, ग्राम पंचायत कार्यालय, भवानीमाता मंदिर, दोरेवाडी सभामंडप, निधवली ग्राम पंचायत, सभामंडप, मानटवाडी जिल्हा परिषद शाळा, पाडले जिल्हा परिषद शाळा यांचे देखील अतोनात नुकसान झाले आहे. दरम्यान या सर्व आपत्तीचे पंचनामे करण्यात आले असून त्याचा अहवाल जिल्हा स्तरावर पाठवण्यात आला आहे.


अचानक आलेल्या अवकाळी पाऊस आणि सोसाटच्याच्या वाऱ्यामुळे पेण तालुक्यातील अनेक नागरिकांचे वेगवेगळ्या प्रकारचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. त्याचे आम्ही तातडीने पंचनामे करून घेतले असून त्याचा अहवाल जिल्हा स्तरावर पाठवला आहे. लवकरात लवकर नुकसानग्रस्त नागरिकांना भरपाई मिळवून देण्याचे प्रशासनाचे प्रयत्न असतील अशी माहिती तहसीलदार तानाजी शेजाळ यांनी दिली.

# आराठी ग्रामपंचायतीकडून शुद्धीकरण केलेल्या पाण्याचा अपव्यय

**श्रीवर्धन : बातमीदार**

श्रीवर्धन शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या रानवली पाझर तलावापासून यापूर्वी येणारे पाणी हे थेट ग्रॅव्हिटीचे पाणी येत होते. सदर पाण्याचे कोणत्याही प्रकारे शुद्धीकरण केले जात नव्हते. मात्र रायगडचे खासदार सुनील तटकरे व श्रीवर्धन मतदारसंघाच्या आमदार अदिती तटकरे यांच्या प्रयत्नातून श्रीवर्धन नगरपरिषदेने रानवली पाझर तलावाजवळ जलशुद्धीकरण प्रकल्प उभारला आहे. या जलशुद्धीकरण प्रकल्पातून येणारे पाणी श्रीवर्धन शहराला लागून असलेल्या आराठी ग्रामपंचायत हद्दीमधील नागरिकांनाही पुरविण्यात येते.

यासाठी आराठी ग्रामपंचायतीने उंच जागेवरती दोन टाक्या नवीन बांधल्या आहेत. तर एका जुन्या टाकीतून पाणीपुरवठा करण्यात येत आहे. मात्र या प्राण्यांच्या साठवण



टाकीजवळ मोठ्या प्रमाणावरती शुद्धीकरण केलेल्या पाण्याचा अपव्य होत आहे तर मुख्य पाईपलाईनला देखील अनेक जोडण्या केलेल्या दिसत आहे . याचा अर्थ या ठिकाणाहून पाणी चोरीच्या घटना देखील घडत आहेत.

शुद्धीकरण केलेले पाणी जवळपास असलेल्या बागायतरांना पुरवण्यात येत असल्याबाबत देखील माहिती प्राप्त झाली आहे. दिवसाकाठी जवळपास वीस हजार लिटर पाण्याचा अपव्यय होत असल्याची शक्यता आहे. आराठी ग्रामपंचायत कर्मचाऱ्याने पाणीपुरवठा सुरू केल्यानंतर अपव्यय होणारे पाणी गटारासारख्या खोल जागेतून वाहून जाताना दिसते. याचा अर्थ या ठिकाणी देखील पाणी चोरी निश्चितपणे होत आहे. याची दखल संबंधित विभागाने घेण्याची गरज आहे

या संपूर्ण प्रकल्पाचा खर्च श्रीवर्धन नगरपरिषद करत असून, शहरातील नागरिकांनी भरलेल्या करातून हे खर्च करण्यात येत असतात. परंतु अशा प्रकारे पाण्याचा अपव्यय व चोरी होत असेल तर, त्या ग्रामपंचायतीचा पाणीपुरवठा श्रीवर्धन नगर परिषदेने बंद करावा. याबाबत आराठी ग्रामपंचायतीचे ग्रामविकास अधिकारी यांचे जवळ संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता, ते विस्तार अधिकारी म्हणून म्हसळा येथे रुजू झाल्याची माहिती प्राप्त झाली.

# 'वाचन केल्यास आपल्या ज्ञानाच्या कक्षा वाढतील'

**चौक : प्रतिनिधी**

रोजच वाचन केल्यास आपल्या ज्ञानाच्या कक्षा वाढतील, भारत रत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी वाचनातून मोठे ज्ञान आत्मसात केले, म्हणूनच त्यांनी प्रवाहाच्या विरुद्ध जाऊन समाजासाठी कार्य केले, असे प्रतिपादन खालापूर वरिष्ठ पोलीस निरीक्षक सचिन पवार यांनी केले भारतीय संविधानाचे शिल्पकार विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची १३४ वी जयंती भीमशक्ती नवतरुण मित्र मंडळ व रमाबाई महिला मंडळ चौक यांच्या वतीने मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली, त्या प्रसंगी वरिष्ठ पोलीस निरीक्षक सचिन पवार प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते.



यावेळी जेष्ठ विधीतज्ञ अविनाश देशमुख, शिवव्याख्याते प्रशांत देशमुख,पोलीस उप निरीक्षक विशाल पवार, ॲड.मिलिंद गायकवाड, ॲड. मिलिंद सुरावकर, ग्राम पंचायत सदस्य ॲड. रीना सोनटक्के, प्रा.कांबळे,सचिन मते, राजू कापरेकर यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

या वेळी विद्यार्थ्यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनावर भाषणे केली. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी शिक्षणाच्या ताकदीवर संघर्ष करून समाजाला ज्ञानाची ताकद दिली, असे शिवव्याख्याते प्रशांत देशमुख यांनी बोलताना सांगितले. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनावर निबंध स्पर्धा आयोजित करण्यात आली होती, त्याचे पारितोषिक वितरण करताना विद्यार्थी यांना शैक्षणिक साहित्याची मदत करण्यात आली. ध्वजारोहण, पूजापाठ व सूत्रपठण कार्यक्रम झाले.

# रायगड निवासी शिक्षक संघाकडून गुणवंतांचा सत्कार

**तळा : प्रतिनिधी**

रायगड निवासी शिक्षक संघ तळाच्यावतीने गायमुख पन्हेली येथील काळबादेवी मंदिर सभागृहात यशस्वी विद्यार्थी व गुणवंत शिक्षकांचा सत्कार समारंभ रायगड निवासी शिक्षक संघाचे अध्यक्ष अमिश भौड यांचे अध्यक्षतेखाली करण्यात आला.



यावेळी व्यासपीठावर रायगड निवासी संघाचे अध्यक्ष अमिश भौड,गटशिक्षणाधिकारी सुरेखा तांबट,भानू मंचेकर, संदिप जामकर,समितीचे जिल्हाध्यक्ष विजय येलवे,अनंत वारे,दिपक ठाकूर,यशवंत मोंढे,संदिप खैरे,राजेंद्र कुडेकर,कल्याणी वाजे,उरण पतपेढी चे चेअरमन मंदार रसाळ,रत्नाकर पाटील,कृष्णा कांबळे,संघाचे सचिव महेंद्र देवरूसकर, जगदीश कासे,धर्मा राणे, सुनिल बयकर, मित्तल वावेकर,प्रिया गायकवाड,उल्का माडेकर, सुप्रिया जामकर,आदिंसह यशस्वी विद्यार्थी,पालक,रायगड निवासी संघाचे पदाधिकारी व सदस्य, मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी नवोदय व शिष्यवृत्ती परीक्षेत यश प्राप्त केलेले गुणवंत विद्यार्थी, उच्च शिक्षण पुर्ण केलेले विद्यार्थी, गुणवंत शिक्षक यांचा सत्कार मान्यवरांचे हस्ते सन्मानचिन्ह, सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले.यावेळी मान्यवरांनी मनोगतात म्हटले की रायगड निवासी संघाचे काम चांगल्या पध्दतीने होत आहे.त्याच बरोबर सर्व क्षेत्रात यशस्वी विद्यार्थी व व्यक्तिचे तसेच गुणवंत शिक्षकांचे गौरव करताना त्यांना एक प्रोत्साहन मिळून अधिक काम करण्याचे बळ मिळते, असेही म्हणाले.

# माणगावच्या ऋषिकेश मालोरेला शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार जाहीर

**माणगाव : प्रतिनिधी**

महाराष्ट्रातील प्रतिष्ठेच्या समजल्या जाणाऱ्या शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कारांची घोषणा मंगळवार दि.१५ एप्रिल रोजी करण्यात आली. या मानाच्या शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार (सन २०२३ - २४ ) करिता रायगड जिल्ह्यातील माणगाव तालुक्यातील न्हावे गावचे प्रसिद्ध वकील ॲड.पुंडलिक मालोरे यांचा सुपुत्र ऋषिकेश मालोरे याने वुशू खेळात विशेष अशी चमक तालुका,जिल्हा,राज्य व राष्ट्रीय पातळीवर दाखविल्याने निवड करण्यात आली आहे.

सदर पुरस्काराचे वितरण पुण्यात शुक्रवार दि.१८ एप्रिल रोजी सकाळी ११ वा.बालेवाडी येथील शिवछत्रपती क्रीडा संकुलात राज्यपाल सीपी राधाकृष्ण यांच्या उपस्थितीत पार पडणार आहे. या सोहळ्याला राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस,उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे,अजित पवार,केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ,उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील,क्रीडामंत्री दत्तात्रय भरणे ,विधान सभेच्या उपसभापती नीलम गोऱ्हे,राज्यमंत्री माधुरी मिसाळ आदी मान्यवर उपस्थित राहणार असून अप्परमुख्य सचिव अनिल डिग्गीकर व क्रीडा आयुक्त हिरालाल सोनावणे यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. कु.ऋषिकेश मालोरेला प्रतिष्ठेचा शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार जाहीर झाल्याने त्याचे सर्व स्तरांतून अभिनंदन व कौतुक होत आहे.



ऋषिकेश याचे केजी ते बारावी पर्यंतचे शिक्षण माणगाव येथील एस.एस.निकम इंग्लिश स्कुल अँड.जुनिअर सायन्स कॉलजमध्ये झाले. त्यानंतरचे पुढील महाविद्यालयीन शिक्षण त्याचे द.ग.तटकरे महाविद्यालय माणगाव येथे झाले. आता तो भारतीय विद्यापीठ पुणे येथे बीपीएडचे शिक्षण घेत आहे. वुशू खेळात ऋषिकेश याने दहावीपासून जिल्हा व राज्य पातळीवर सुवर्ण पदके पटकावली असून जुनिअर व सिनिअर गटात राष्ट्रीय स्तरावर सुवर्ण पदके पटकावली आहेत.

**माझ्या या भरारीत माझे आई-वडील ,मला घडविलेली माझी शाळा,महाविद्यालय येथील सर्व शिक्षकवर्ग त्याचप्रमाणे क्रीडा क्षेत्रात मला नेहमीच मार्गदर्शन करून पुढे जाण्यासाठी प्रोत्साहित करणारे माझे क्रीडा मार्गदर्शक महाराष्ट्र राज्याचे वुशू असोसिएशनचे सचिव सोपान कटके,जिल्हा सचिव दत्तात्रय पाटील,स्मितील पाटील तसेच स्थानिक पातळीवर माणगाव येथील प्रसिद्ध क्रीडा शिक्षक मंदार चवरकर या सर्वांचे मी मनापासून ऋण व आभार व्यक्त करतो.**

**- ऋषिकेश मालोरे**

क्रीडा क्षेत्रातील वुशू खेळात ऋषिकेशला महाराष्ट्र राज्याचे वुशू असोसिएशनचे सचिव सोपान कटके,जिल्हा सचिव दत्तात्रय पाटील,स्मितील पाटील तसेच स्थानिक पातळीवर माणगाव येथील प्रसिद्ध क्रीडा शिक्षक मंदार चवरकर यांचे विशेष असे मार्गदर्शन लाभले.

# 'हेल्प फाऊंडेशन म्हणजे जखमी मनुष्य, पशु पक्षी यांचा आधार'

**चौक : प्रतिनिधी**

हेल्प फाऊंडेशन म्हणजे मनुष्य जीवनातील दुसरा परमेश्वर, मदतीला तत्काळ धाऊन जाऊन जीवदान देणे म्हणजेच हेल्प फाऊंडेशन मनुष्य, पशु पक्षी यांचा आधार,असे प्रशंसनीय उदगार उप विभागीय पोलीस अधिकारी विक्रम कदम यांनी काढले.

खालापूर पोलीस निरीक्षक सचिन पवार यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३४ वी जयंती खालापूर पोलीस ठाण्यात आयोजित केली होती. यावेळी दैनंदिनी जीवनात पशु, पक्षी व मनुष्य यांचे अपघात होतात, त्यांना वेळेवर उपचार करणे,विषारी,बिनविषारी साप घर,दुकान, परिसरातील आवारात येतात, त्यांना सुरक्षित पकडून त्यांच्या अधिवासात सोडून देणे, रस्त्यावरील अपघातात जखमी जनावरे यांना होणारी इजा यावर तत्काळ उपचार हेल्प फाऊंडेशन यांच्या मदतीने होते, त्यांच्या या कार्याची दखल घेऊन खालापूर पोलीस निरीक्षक सचिन पवार यांनी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीचे औचित्य साधून हेल्फ फाऊंडेशनचा सत्कार

यावेळी शिवव्याख्याते प्रशांत देशमुख, यांच्या उपस्थितीत गुरुनाथ साठेलकर,भक्ती साठेलकर, ऋपुजा चांदुरकर, ऋविजय भोसले,ऋअमोल कदम, ऋराजेश पारठे, ऋहनिफ कर्जिकर, धनंजय गिध,अमीत गुजरे, जयेश ठक्कर,प्रविण शेंद्रे यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी माजी नगराध्यक्षाशिवानी जंगम, उपस्थित होते.



# श्रीवर्धन आगारात बीएस-६ दर्जाच्या पाच नव्या बसगाड्यांचे लोकार्पण

## लवकरच आणखी पाच बसेस सेवेत

**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

श्रीवर्धन आगारात बीएस-६ दर्जाच्या अत्याधुनिक पाच नव्या बसगाड्यांचे लोकार्पण महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांच्या हस्ते श्रीवर्धन बसस्थानकात करण्यात आले. या लोकार्पण सोहळ्यामुळे श्रीवर्धन तालुक्यातील प्रवाशांना अधिक सुलभ, सुरक्षित आणि पर्यावरणपूरक प्रवासाचा नवा अध्याय सुरू होणार आहे.



लोकार्पण प्रसंगी मंत्री आदिती तटकरे म्हणाल्या, श्रीवर्धन तालुक्यातील नागरिकांचा प्रवास अधिक आरामदायक व्हावा, यासाठी मी सातत्याने प्रयत्नशील होते. त्या प्रयत्नांना यश आले असून, बीएस-६ तंत्रज्ञानाने सुसज्ज पाच बसेस श्रीवर्धन आगारात दाखल झाल्या आहेत. येत्या काही दिवसांत आणखी पाच बसेस या आगारासाठी उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.

श्रीवर्धन बसस्थानकाच्या सध्या सुरू असलेल्या नूतनीकरण कामाचीही मंत्री तटकरे यांनी पाहणी केली.आगारप्रमुख महिबूब मणेर यांनी सांगितले की, नवीन बसगाड्या आल्यामुळे श्रीवर्धन-मिरज मार्गावर लवकरच सेवा सुरू करण्यात येणार आहे. तसेच श्रीवर्धन-तुळजापूर, श्रीवर्धन-शिर्डी, हरिहरेश्वर-अक्कलकोट आणि श्रीवर्धन-नालासोपारा या मार्गांवर देखील बीएस-६ बसगाड्या प्रवाशांसाठी उपलब्ध होणार आहेत. लवकरच या मार्गांचे वेळापत्रक जाहीर करण्यात येईल. आगारात आणखी पाच गाड्या दाखल झाल्यावर इतर फेर्यांचे नियोजन अधिक चांगल्या पद्धतीने करता येईल.


या कार्यक्रमादरम्यान प्रवासी वर्गाने अलिबाग, दापोली, पुणे व भाईंदर या पूर्वी नियमित असलेल्या बसगाड्या पुन्हा सुरू करण्याची मागणी केली. मंत्री आदिती तटकरे यांच्याकडे ही मागणी सादर करण्यात आली. मात्र रायगड विभाग नियंत्रक दीपक घोडे यांनी स्पष्ट केले की, या बसेस तोट्यात असल्यामुळे सध्या त्यांचे संचालन शक्य नाही.

# निगुडशेत पुलामुळे पावसाळ्यात विद्यार्थी व नागरिकांची होणार सोय

**तळा : प्रतिनिधी**

तळा तालुक्यातील ग्रामीण भागातील निगुडशेत रस्त्यावर जुना पुल होता या पुलावर पावसाळ्यात अनेकवेळा पाणी येत असल्याने पलीकडे जाण्यास अडथळे येऊन वाहतुक कोंडी होत होती. व पुलावरील पाणी ओसरल्यानंतर पुन्हा वाहतुक सुरू होत होती . यामुळे या ठिकाणी नवीन पुल बांधण्याची नागरिक, प्रवासी,ग्रामस्थ यांची मागणी होती

या पुलाचे काम चालु झाल्याने या मार्गावरील प्रवाशांतून समाधान व्यक्त केले जात आहे.या पुलाचे काम पावसाळ्यापुर्वी पुर्ण झाल्यास पावसाळ्यात विद्यार्थी व नागरिकांची होणारी अडचण दुर होणार आहे.



# लेखापाल कामकाजासाठी वनविभागातून सेवानिवृत्त झालेल्या इच्छुक लेखापालांनी अर्ज करावेत

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

विभागीय वन अधिकारी कांदळवन विभाग दक्षिण कोकण कार्यालयात वनविभागातून सेवानिवृत्त झालेल्या अनुभवी लेखापालाची कामकाजासाठी आवश्यकता असून इच्छुक सेवानिवृत्त लेखापालांनी ही बातमी प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसाचे आत त्यांचे अर्ज विभागीय वन अधिकारी कांदळवन विभाग दक्षिण कोकण, स्वप्नपूर्ती बंगला, होरायझन हॉलच्या मागे, मु.लक्ष्मीनगर, पो.वरसोली, ता. अलिबाग, जि.रायगड या कार्यालयात लेखी स्वरुपात समक्ष येवून सादर करावेत, असे आवाहन विभागीय वन अधिकारी कांदळवन विभाग दक्षिण कोकण कांचन पवार यांनी केले आहे.

महसूल व वन विभागाच्या दि.०२ ऑगस्ट २०२४ शासन निर्णयान्वये कांदळवन कक्ष मुंबई पुर्नरचना होवून (रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग जिल्हा) कांदळवन विभाग दक्षिण कोकण विभागाची स्थापना करण्यात आलेली आहे. विभागीय वन अधिकारी कांदळवन विभाग दक्षिण कोकण यांचे कार्यालयाचे मुख्यालय अलिबाग रायगड येथे आदेशित केले असून अलिबाग येथे स्थित आहे. विभागीय वन अधिकारी कांदळवन विभाग दक्षिण कोकण विभागांतर्गत वनपरिक्षेत्र रायगड, रत्नागिरी, मालवण (सिंधुदुर्ग) कांदळवन हे समाविष्ट आहेत. विहित मुदतीनंतर प्राप्त अर्जाचा विचार केला जाणार नाही.

# पंजाब किंग्सने मैदान मारलं!

**दिल्ली : वृत्तसंस्था**



आयपीएल २०२५ स्पर्धेच्या ३१ व्या सामन्यात पंजाब किंग्सने कोलकाता नाईट रायडर्सला धोबीपछाड दिला आहे. या सामन्यात नाणेफेकीचा कौल पंजाब किंग्सच्या बाजूने लागला, मात्र असं होऊनही सर्व काही चुकत गेले.

प्रथम फलंदाजी करताना मोठी धावसंख्या उभारण्यात अपयश आलं. इतकंच काय तर पंजाब किंग्स संघाला २० षटकंही पूर्ण खेळता आली नाही. पंजाबचा संघ १५.३ षटकात १११ धावांवर ऑलआऊट झाला. कोलकाता नाईट रायडर्स संघासमोर विजयासाठी ११२ धावांचं आव्हान होतं. हे आव्हान कोलकाता सहज गाठेल असं वाटत होतं. पण पंजाबने तसं होऊ दिलं नाही. पॉवर प्लेमध्ये दोन मोठे धक्के दिले. पंजाब किंग्सने कमबॅकसाठी सर्वस्वी पणाला लावलं होतं, पण कर्णधार अजिंक्य रहाणे आणि अंगकृष रघुवंशी यांना धाव सावरला आणि सावध खेळी केली. पण ही जोडी फुटली आणि सर्व काही धडाधड कोसळलं.

कोलकाता नाईट रायडर्सकडून क्विंटन डी कॉक आणि सुनील नरीन ही जोडी मैदानात आली होती. पण सुनील नरीन ४ चेंडूत ५ धावा करून बाद झाला. त्यानंतर क्विंटन डी कॉकही काही खास करू शकला नाही. डी कॉक फक्त २ धावा करून बाद झाला. खेळपट्टीचा अंदाज घेऊन कर्णधार अजिंक्य रहाणे आणि अंगकृष रघुवंशी यांनी साजेशी खेळी केली. पॉवर प्लेमध्ये ५५ धावांपर्यंत मजल मारून अर्ध लक्ष्य गाठलं होतं. ६२ धावांपर्यंत सर्वकाही ठीक होतं. पण त्यानंतर एकापाठोपाठ एक विकेट पडत गेल्या. कोलकात्याचा संपूर्ण संघ ९५ धावांवर बाद झाला.

कोलकाता नाईट रायडर्स संघाकडून सर्वच गोलंदाजांना कमाल केली होती. हार्षित राणाच्या भेदक गोलंदाजीमुळे पंजाब बॅकफूटवर गेली. हार्षित राणाने ३ षटकात २५ धावा देत ३ गडी बाद केले. तर वरुण चक्रवर्तीने ४ षटकात २१ धावा देत २ गडी टिपले. सुनील नरीनला फलंदाजीत काही खास करता आलं नाही. पण गोलंदाजीत कमाल केली. त्याने ३ षटकात १४ धावा देत दोन गडी बाद केले. तर वैभव अरोरा आणि एनरिक नोर्त्जे ने प्रत्येकी १ गडी बाद केला. पण या सर्वांवर युझवेंद्र चहल भारी पडला. त्याने पंजाबला या सामन्यात कमबॅक करण्यात यश मिळवलं.

# रोह्यात रंगली क्रिकेट स्पर्धा

**धाटाव : प्रतिनिधी**

रोहा तालुक्यातील वैभल इलेव्हन मलखंडवाडी या संघाने वीर सावरकर क्रिकेट चषकाचे आयोजन केले होते. या स्पर्धेत तालुक्यातील नामवंत ३२ संघाने सहभाग नोंदवला तर अंतिम लढत ही अंशुल विरुद्ध रोहा रॉयल्स या दोन उभय संघामध्ये अत्यंत चुरशीची लढत प्रेक्षकांना पाहायला मिळाली.

प्रथम फलंदाजी करताना अंशुल संघाने मर्यादित ४ षटकात ४ बाद ७७ धावा ठोकल्या होत्या तर प्रतिस्पर्धी रोहा रॉयल्स संघाने पहिल्या ३ शतकामध्ये तब्बल ७० धावा बनवल्या तर उर्वरित ६ चेंडू मध्ये ७ धावांची गरज असताना अंशुल संघाचा अष्टपैलू खेळाडू अनिरुद्ध महागावकर या निर्णायक षटकामध्ये लगातार तीन विकेट घेत हॅट्रिक साधली तर भेदक गोलंदाजीमुळे रोहा रॉयल संघाला पराभूत व्हावे लागले वीर सावरकर चषकावर अंशुल संघाने नाव कोरून प्रथम क्रमांकाचा मानकरी ठरला .



तालुक्यातील क्रीडा संकुलन येथे भव्यदिव्य क्रिकेट स्पर्धेचे आयोजन मलखंडवाडीचे आधारस्तंभ तथा तालुक्यातील दानशूर व्यक्तिमत्व हेमंत सणस यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली ही स्पर्धा संपन्न झाली . या स्पर्धे ला भेट देण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेश सरचिटणीस विजयराव मोरे यांनी या स्पर्धेला भेट देऊन शुभेच्छा दिल्या तर स्पर्धेत प्रथम क्रमांक अंशुल संघ , द्वितीय क्रमांक रोहा रॉयल्स, तृतीय क्रमांक वैभव ११ मलखंडवाडी , चतुर्थ क्रमांक सोनेश्वर नवी संघाने पटकावला या सर्व संघांना रोख रक्कम व सन्मान चिन्ह देऊन गौरवण्यात आले .

या स्पर्धेचा सर्वोत्कृष्ट खेळाडू रोहा रॉयल्स संघाचा मझर गौरी, उत्कृष्ट फलंदाज वैभव ११ संघाचा अष्टपैलू खेळाडू सचिन माळी, उत्कृष्ट गोलंदाज अंशुल संघाचा अनिरुद्ध महागावकर यांना गौरवण्यात आले . तर स्पर्धे चे धावते समालोचनाची भूमिका महाराष्ट्रातील प्रसिद्ध समालोचक संदीप जगे, यासीम मर्चंट, किशोर कोकरे, उमेश साळुंखे यांनी केले.

# रोहा तालुका क्रीडा संकुलात उन्हाळी क्रीडा शिबिर

## विविध खेळांचे दिले जाणार प्रशिक्षण

**धाटाव : प्रतिनिधी**

रोहा तालुका क्रीडा अधिकारी अंकिता मयेकर यांच्या मार्गदर्शनाखाली धाटाव येथील क्रीडा संकुलात उन्हाळी क्रीडा शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. हे प्रशिक्षण २५ एप्रिल ते ७ मे असे पंधरा दिवस आयोजित करण्यात आले आहे.



या प्रशिक्षण शिबिरात व्हॉलीबॉल, कबड्डी, अथॅलेटिक्स, मिक्स बॉक्सिंग, लाठी-काठी, कराटे व व्यक्तिमत्व विकास याविषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात येणार आहे. रोहा तालुक्यातील ८ ते १६ वयोगटातील शालेय विद्यार्थ्यांना याचा लाभ होणार असल्याचे तालुका क्रीडा अधिकारी अंकिता मयेकर यांनी सांगितले.

तालुक्यातील तज्ज्ञ क्रीडा मार्गदर्शक रवींद्र कान्हेकर, राकेश म्हसकर, राष्ट्रीय खेळाडू अमित दळवी, विनायक सकपाळ, मुकेश भगत, अश्विनी चव्हाण, रोहन शेवाळे, रीद्धी सकपाळ, प्रशांत मोहिते, श्रेयश म्हसकर, दृती लाड, अवधूत घरट, तेजश करंज, राहुल मोहिते, विशाल गोवर्धने आदी मार्गदर्शन करणार आहेत. खेळाडूंनी आपले प्रवेश अर्ज धाटाव क्रीडा संकुलामध्ये क्रीडा मार्गदर्शक रवींद्र कान्हेकर यांच्याकडे जमा करावेत, असे आवाहन करण्यात आले आहे.

# गोयंका चक्क पराभवानंतरही हसले; फोटो व्हायरल

**लखनऊ : वृत्तसंस्था**

लय गमावलेल्या चेन्नईच्या संघाने अखेर सलग पाच पराभवानंतर एक विजय मिळवला. त्यांनी चांगल्या लयीत असलेल्या लखनऊ सुपर जायंट्सचा पराभव केला. सहसा आपला संघ हरल्यानंतर मालक संजीव गोयंका संतप्त प्रतिक्रिया देताना दिसतात, पण या पराभवानंतर गोयंका त्यांची एक वेगळीच झलक पहायला मिळाली.



लखनऊ सुपर जायंट्सचे मालक संजीव गोयंका हे त्यांच्या संघाच्या पराभवानंतर अनेकदा थोडे रागावलेले दिसतात आणि कर्णधार-प्रशिक्षकांशी गंभीर संभाषण करताना दिसतात, पण या वेळी ते वेगळ्याच रूपात मैदानावर आले. पराभवानंतरही गोयंका हे ऋषभ पंतसोबत हसताना आणि विनोदी गप्पा मारताना दिसले.

सामन्यानंतर संजीव गोयंका यांनी चेन्नई सुपर किंग्जचा कर्णधार एमएस धोनीचीही भेट घेतली. या वेळी धोनी एकेकाळी गोयंका यांच्या संघाचा भाग होता. गोयंका हे रायझिंग पुणे सुपर जायंट्स संघाचे मालक असतान धोनी संघात होता. त्या वेळी काही मतभेदांमुळे त्यांनी धोनीला कर्णधारपदावरून दूर केले होते, पण सोमवारी ते वेगळ्याच मूडमध्ये होते आणि सगळ्यांशी हसतखेळत गप्पा मारताना दिसले.

# आरडीसीएच्या प्रीमियर लीगसाठी खेळाडूंचा खोपोलीत होणार ऑक्शन

**अलिबाग, खोपोली : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या प्रीमियर लीग टी-२० क्रिकेट स्पर्धेसाठी खेळाडूंचे विविध संघांमध्ये लिलाव शुक्रवारी (दि.१८) खोपोली येथील कॅम्पोलियन हॉटेल अ‍ॅण्ड रिसॉर्टमध्ये दिमाखदार कार्यक्रमा द्वारे व जिल्ह्यातील विविध क्रीडा, सामाजिक व राजकीय मान्यवरांच्या उपस्थितीत होणार आहे.

रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्या वतीने ह्यावर्षी पासून पुरुष व महिलांसाठी टी-२० क्रिकेट प्रीमियर लीग स्पर्धेचे आयोजन केले आहे. त्याला जिल्ह्यातील विविध वयोगटातील ३६७ पुरुष व महिला खेळाडूंनी ऑनलाइन गुगल फॉर्मद्वारे नोंदणी करून उत्स्फूर्तपणे प्रतिसाद दिला असल्याची माहिती आरडीसीएचे खजिनदार प्रशांत ओक यांनी प्रसार माध्यमांना दिली. स्पर्धेत सहभागी होण्यासाठी जिल्ह्यातील आठ संघांच्या संघमालकांनी आपल्या संघाचा सहभाग निश्चित केला आहे. प्रीमियर लीग स्पर्धेसाठी प्रत्येक संघाला त्यांच्या पसंतीनुसार एक आयकॉन व एक कर्णधार असे दोन खेळाडू ऑक्शन पूर्वी निवडण्याची संधी दिली होती त्याप्रमाणे प्रत्येक संघानी आपापले आयकॉन खेळाडू व संघाचा कर्णधार निवडले आहेत. बाकी सर्व नोंदणीकृत खेळाडूंचा लिलाव (ऑक्शन ) करून त्यांना आठ संघांचे प्रतिनिधी आपापल्या संघात सामील करून घेतील. स्पर्धा मे महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यापासून रायगड जिल्ह्यातील छत्रपती शिवाजी महाराज स्टेडियम पेण व छत्रपती शिवाजी महाराज क्रिकेट मैदान उलवे अश्या दोन ठिकाणी एकाच वेळी होणार असल्याचे प्रशांत ओक यांनी सांगितले.

स्पर्धेसाठी एमसीएचे पंच,स्कॉरर व सामनाधिकारी योगदान देणार असून स्पर्धेसाठी महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष आमदार रोहित पवार, सचिव अ‍ॅड. कमलेश पिसाळ यांच्यासह इतर पदाधिकारी व सदस्य उपस्थित राहणार आहेत.

# छत्रपती शिवाजी कॉलेजच्या तीन खेळाडूंना शासनाचा शिवछत्रपती क्रीडा पुरस्कार जाहीर

**सातारा : प्रतिनिधी**

येथील कर्मवीर भाऊराव पाटील विद्यापीठाचे घटक महाविद्यालय असलेल्या रयत शिक्षण संस्थेच्या छत्रपती शिवाजी कॉलेज मधील तीन आंतरराष्ट्रीय विजेत्या खेळाडूना महाराष्ट्र शासनाचा मानाचा शिवछत्रपती पुरस्कार जाहीर झाला.

छत्रपती शिवाजी कॉलेजमध्ये बी.ए. द्वितीय वर्षात शिकणारा आर्चरी मधील जागतिक विजेता, अर्जुन पुरस्कार प्राप्त खेळाडू ओजस देवतळे याला थेट शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार जाहीर झाला. त्याने जर्मनी आणि फ्रांस येथील जागतिक अर्चारी स्पर्धेत भारताला प्रथमच विजेतेपद मिळवून दिले. त्याने मागील वर्षी चीन येथे झालेल्या एशियन गेम्स मध्ये तीन सुवर्णपदके मिळविली आहेत.

नुकत्याच अमेरिका येथे झालेल्या जागतिक स्पर्धेत त्याने भारतीय संघाला कांस्यपदक मिळवून दिले आहे. २३-२४ या वर्षी त्याला प्रतिष्ठेच्या अर्जुन पुरस्काराने सम्मानित करण्यात आले आहे. याच कामगिरीच्या जोरावर त्याला थेट पुरस्कार जाहीर झाला आहे. संस्कृती मोरे ही पॅरा अ‍ॅथलिट असून २०२३-२४ मध्ये चीन येथे झालेल्या पॅरा एशियन गेम्स मध्ये तिने बुद्धिबळ मध्ये भारतातर्फे सांघिक कांस्यपदक मिळविले. महाराष्ट्र शासनाने तिची विशेष क्रीडा कार्यकारी अधिकारी वर्ग १ या पदावर नियुक्ती केली असून तिला मानाचा शिवछत्रपती क्रीडा पुरस्कार (अंध - बुद्धिबळ) जाहीर करून सम्मान केला आहे. तिसरा शिवछत्रपती पुरस्कार आंतरराष्ट्रीय खेळाडू पृथ्वीराज पाटील (रग्बी) याला जाहीर झाला असून त्याने अनेक आंतरराष्ट्रीय रग्बी स्पर्धांमध्ये भारताचे प्रतिनिधित्व करून पदके मिळविली आहेत.

छत्रपती शिवाजी कॉलेजच्या या तीन विद्यार्थ्यांनी मिळविलेल्या या यशामुळे छत्रपती शिवाजी कॉलेज, रयत शिक्षण संस्था आणि कर्मवीर भाऊराव पाटील विद्यापीठ, सातारा यांच्या शिरपेचात मानाचा तुरा रोविला आहे. या यशाबद्दल, रयत शिक्षण संस्थेचे चेअरमन चंद्रकांत दळवी, माजी विद्यार्थी संघाचे अध्यक्ष लोकनेते रामशेठ ठाकूर, छत्रपती शिवाजी कॉलेजचे प्राचार्य डॉ. राजेंद्र मोरे, क. भा. पा. विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. ज्ञानदेव म्हस्के, रयत शिक्षण संस्थेचे सचिव विकास देशमुख, सहसचिव प्राचार्य डॉ. शिवलिंग मेनकुदळे, बंडू पवार, गुणवत्ता हमी कक्षचे प्रमुख, उपप्राचार्य डॉ.अनिलकुमार वावरे, उपप्राचार्य डॉ. सुभाष वाघमारे, उपप्राचार्य डॉ.आर.एस. माने-देशमुख, जिमखाना विभाग प्रमुख प्रा. विक्रमसिंह ननावरे, डॉ. धनंजय नलवडे, प्रा. अभिषेक कदम आदींनी त्यांचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या आहेत.

# फुंडे येथे होणार राज्यस्तरीय पॉवरलिफ्टिंग स्पर्धा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या भागुबाई विद्यालय फुंडे येथे अ‍ॅमॅच्युअर पॉवरलिफ्टिंग असोसिएशन महाराष्ट्र या संघटनेच्या वतीने राज्यस्तरीय पॉवरलिफ्टिंग स्पर्धा १९ व २० एप्रिल २०२५ रोजी आयोजित करण्यात आलेली आहे. या स्पर्धेचे उद्घाटक माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांना संघटनेच्या वतीने निमंत्रण देण्यात आले.



या स्पर्धेचे उद्घाटन लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते करण्याचे संघटनेने ठरविलेले आहे. त्याअनुषंगाने निमंत्रण देण्यात आले. या वेळी भाजप नेते मेघनाथ तांडेल, चंद्रकांत घरत, संतोष शिंदे, मैत्रेय मोकल आदी उपस्थित होते.

# रोहित शर्माचा होणार विशेष सन्मान

**मुंबई :** भारतीय क्रिकेटमध्ये महत्त्वपूर्ण योगदान देणाऱ्या रोहित शर्माचा मुंबई क्रिकेट असोशिएशनकडून विशेष सन्मान करण्यात आला आहे. टीम इंडियाने, टी२० वर्ल्ड कप पाठोपाठ चॅम्पियन्स ट्रॉफी या दोन महत्त्वाच्या आयसीसी स्पर्धा रोहित शर्माच्या नेतृत्वाखाली जिंकल्या. टीम इंडियाला वर्ल्ड क्रिकेटमध्ये चॅम्पियन बनवण्यात रोहित शर्माच महत्त्वाच योगदान आहे. हीच बाब ध्यानात घेऊन मुंबई क्रिकेट असोशिएशनने रोहित शर्माला सन्मानित केले आहे. ज्या वानखेडे स्टेडियममध्ये खेळून रोहित शर्मा मोठा झाला, त्याच स्टेडियममध्ये रोहितच्या नावाचा स्टँड असणार आहे.

# झहीर-सागरिका झाले आई-बाबा


**मुंबई : प्रतिनिधी**


अभिनेत्री सागरिका घाटगे आणि भारताचा माजी क्रिकेटर झहीर खान आई-बाबा बनले असून त्यांच्या घरी चिमुकल्या पाहुण्याचे आगमन झाले आहे. सोशल मीडियावर पस्ट करत दोघांनी सर्वांसोबत ही गुड न्यूज शेअर केली आहे. जहीर-सागरिकाला मुलगा झाला असून त्या तिघांचा एक खास फोटो पोस्ट करत त्यांनी मुलाचं नावही जाहीर केलं आहे.

'प्रेम, कृतज्ञता आणि दैवी आशीर्वादासह आम्ही आमच्या मुलाचे, फतेहसिंह खान याचे स्वागत करत आहोत.' ब्लॅक अँड व्हाईट २ फोटोंसह अशी कॅप्शन लिहीत त्यांनी मुलाचं नाव सर्वांना सांगितलं आहे. अनेकांनी दोघांना शुभेच्छा दिल्या आहेत.



सौजन्य : गौरव नाईक, युवा मोर्चा अध्यक्ष



ज्ञानराज माझी योग्यांची माऊली।। जेणे निगमवल्ली प्रगट केली।।


विठ्ठल रुख्मीणी तुम्ही अखंड आणा ध्यानी।।

वर्ष २० वे

वाचावी ज्ञानेश्वरी । डोळा पहावी पंढरी ।। ज्ञान होय अज्ञानासी। ऐसा वर त्या टीकेसी ।। ज्ञान होय मूढा । अती मूर्ख त्या दगडा ।। वाचील जो कोणी । जनी त्यासी लोटांगणी।।


सर्व मंगल मांगल्ये। शिवेसर्वार्थ साधिके शरण्ये त्र्यंबकेगौरी। नारायणी नमोस्तुते।।


तुकाराम तुकाराम नाम घेता कापे यम।।

श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ पुरस्कृत
माऊली हरिपाठ मंडळ, गव्हाण-कोपर आयोजित

अखंड हरिनाम सप्ताह

ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळा

ठिकाण - श्री शांतादेवी मंदीर, गव्हाण, ता. पनवेल, जि. रायगड

सर्व भाविकांना कळविण्यात आनंद होत आहे की, सालाबादप्रमाणे माऊली हरिपाठ मंडळ, गव्हाण तर्फे स्वा.सु. ह.भ.प. वै. सदानंद गुरुजी (देवाची आळंदी) यांचे परमशिष्य ह.भ.प. शिवाजी महाराज पाटणकर (देवाची आळंदी) यांच्या प्रेरणेने ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळा चैत्र शुद्ध १३, गुरुवार दि. १०/०४/२०२५ ते चैत्र कृ. ४ गुरुवार दि. १७/०४/२०२५ रोजी संपन्न होत आहे. तरी कृपया सर्व भाविकांनी ह्या पर्वणीचा लाभ घ्यावा, ही नम्र विनंती.

काल्याचे कीर्तन, गुरुवार, दि. १७/०४/२०२५ रोजी सकाळी १० ते १२ वा. भाषाप्रभू ह.भ.प. जगन्नाथ महाराज (आसनगाव)
सौजन्य : श्री. महेंद्रशेठ तुकाराम घरत (शेलघर)

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. -मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले.** पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com